महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

मंगळवार, दि. ११ नोव्हेंबर २०२५

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर

आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस

जनरेटर विक्री व दुरस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए

Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४ थे | अंक : ००२ | किंमत : ४.००० रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

दिल्ली हादरली

लाल किल्ल्याजवळ भीषण बॉम्बस्फोट : ९ ठार, २३ जखमी; परिसर सील – एनआयए व एनएसजीचा तपास सुरू!

नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)

राजधानी दिल्लीमध्ये सोमवारी सायंकाळी लाल किल्ला परिसरात झालेल्या भीषण स्फोटाने संपूर्ण देश हादरला आहे. लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १ जवळ उभ्या असलेल्या एका कारमध्ये सायंकाळी ६.५२ वाजता स्फोट झाला. या घटनेत ९ जणांचा मृत्यू झाला असून २३ नागरिक जखमी झाल्याची प्राथमिक माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. साक्षीदारांच्या माहितीनुसार, कार लाल दिव्यावर थांबलेली असतानाच जोरदार आवाजासह ती हवेत उडाली.

क्षणातच आग लागून परिसरात धुराचे लोट व भीतीचे वातावरण निर्माण झाले. आजूबाजूच्या सहा गाड्या व तीन ऑटो जळून खाक झाल्या.

स्फोट होताच दिल्ली पोलिस, अग्निशमन दल आणि आपत्कालीन पथके घटनास्थळी दाखल झाली. आग नियंत्रणात आणण्यासाठी अग्निशमन दलाच्या १० गाड्या तात्काळ दाखल करण्यात आल्या. जखमींना एल.एन.जेपी. हॉस्पिटल व सब्जीमंडी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून काहींची प्रकृती गंभीर आहे.

दिल्ली पोलिस आयुक्त सतीश गोलचा यांनी तात्काळ परिसर सील केला असून संपूर्ण तपासाची जबाबदारी एनआयए (राष्ट्रीय तपास संस्था) व एनएसजी (राष्ट्रीय सुरक्षा रक्षक) यांच्याकडे देण्यात आली आहे.

फॉरेन्सिक तज्ञांनी स्फोटग्रस्त वाहनाचे अवशेष तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले आहेत. प्राथमिक अंदाजानुसार हा स्फोट स्फोटक पदार्थामुळे झाला असावा, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

घटनेची माहिती मिळताच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी उच्चस्तरीय बैठक घेऊन दिल्ली पोलिसांकडून सविस्तर अहवाल मागवला आहे.

"या भ्याड कृत्यामागील दोषींना वाचवता येणार नाही, आणि तपास पूर्ण पारदर्शकतेने होईल," असे त्यांनी सांगितले.

लाल किल्ला, चांदणी चौक, दरियागंज, कश्मीरी गेट परिसर पूर्णपणे बंद करण्यात आला आहे.

देशातील प्रमुख शहरांमध्ये – मुंबई, पुणे, लखनौ, जयपूर आदी ठिकाणीही हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. सार्वजनिक ठिकाणी तपासणी मोहीम वाढवण्यात आली आहे.

रुग्णालयात मृत आणि जखमींच्या नातेवाईकांनी गर्दी केली असून वातावरण हंबरड्याने भरून गेले आहे. काही जखमींवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. डॉक्टर आणि नर्सेस सातत्याने सेवा देत आहेत.

पोलिसांचे आवाहन – अफवांपासून दूर रहा

दिल्ली पोलिसांनी नागरिकांना अफवा पसरवू नये, संशयास्पद वस्तू वा वाहन आढळल्यास तातडीने १०० क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे. "सर्वांनी संयम राखावा आणि कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी सहकार्य करावे," असे पोलिसांनी म्हटले आहे.

काय काय घटना घडल्या?

१) मोठ्या प्रमाणावर स्फोटकं जप्त करण्यात आलली. हरियाणातल्या फरिदाबाद या ठिकाणी पोलिसांनी ३६० किलो अमोनियम नायट्रेट हे स्फोटक पकडलं. तसंच २५०० किलो स्फोटकांसाठी लागणारी रसायनंही पोलिसांनी जप्त केली आहे. तसंच एक रायफल, तीन मॅगझिन, ८३ जिवंत काडतुसं पोलिसांनी जप्त केली.

२) डॉक्टरसह संशयितांना अटक करण्यात आली. अल फतेह विद्यापीठातील डॉक्टर आणि काही संशयितांना पोलिसांनी अटक केली. मुझम्मील शकील असं अटक करण्यात आलेल्या डॉक्टरचं नाव आहे. तर आदिल अहमद नावाच्या डॉक्टरलाही पोलिसांनी अटक केली. इश्तियाक नावाच्या एका इमामलाही पोलिसांनी अटक केली. जैश ए मोहम्मद, अन्सार गझवा अल हिंद या संघटनांवर बंदी घालण्यात आली आहे. या संघटनांचाच हात फरिदाबादच्या प्रकरणात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. दिल्लीवर हल्ला करण्याचे दहशतवाद्यांचे मनसुबे पोलिसांनी उधळून लावले अशी माहितीही समोर आली होती. तरीही दिल्लीत एक स्फोट झाला आहे.

४) पाकिस्तानशी संबंधित हँडलर्सवर कारवाई करण्यात आली आहे. तसंच आणखी शस्त्रं, स्फोटकं आढळून येतात का? यासंदर्भातही पोलिसांचा तपास सुरु आहे.

अतिक्रमणांवर पाटबंधारे विभागाची मोठी कारवाई

खडकवासला : (समर्थ गांवकरी)

खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पाटबंधारे विभागाच्या जमिनीवरील बेकायदा अतिक्रमणांवर अखेर सोमवारी (दि. ११) मोठी कारवाई करण्यात आली. धरण परिसरातील धार्मिक स्थळ, दोन चौपाट्यांवरील टपऱ्या व स्टॉल्स, डोम, हिरव्या रंगाचे पत्राशेड, रिसोर्ट हॉटेल्स, गोठे तसेच रायकर परिसरातील मिळकती अशा एकूण सहा ठिकाणांवरील २० ते २५ हजार चौरस फूट क्षेत्रातील अतिक्रमणे हटविण्यात आली.

पाटबंधारे विभागाचे उपअभियंता मोहन भदाने आणि शाखा अभियंता गिरीजा कल्याणकर-फुटाणे यांनी ही

कारवाई केली. दरम्यान नांदेड सिटी व हवेली पोलीस ठाण्यांचे अधिकारी, पुणे महापालिकेचा अतिक्रमण विभाग, महसूल अधिकारी तसेच जलसंपदा विभागाचे कर्मचारी अशा मोठ्या पथकाची उपस्थिती होती. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल भोस यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्त ठेवण्यात आला होता. खडकवासला, डीआयएटी आणि गोऱ्हे बुद्रुक परिसरातील सुमारे २० ते २५ हजार चौरस फूट क्षेत्रातील बेकायदा बांधकामे व टपऱ्या जेसीबी आणि डंपरच्या सहाय्याने पाडण्यात आल्या.

मंत्री अतुल सावेंच्या नेतृत्वात भाजपची स्वबळाची तयारी

- शिवसेनेच्या बालेकिल्ल्यामध्ये भाजपचीमोठा भाऊ होण्याची सुरू आहे लगबग : राजकीय खेळी

छत्रपती संभाजीनगर : (समर्थ गांवकरी)

जिल्ह्यात शिंदेसेनेच्या वर्चस्वाला आव्हान देत भाजप मोठा भाऊ होण्याच्या तयारीत आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राज्याचे मंत्री अतुल सावे यांच्यावर नेतृत्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. सावे यांनी नुकताच वैजापूर, गंगापूर, पैठण, फुलंब्री आणि सिल्लोडचा आढावा घेत स्वबळावर लढण्याची रणनीती निश्चित केली आहे. 'गरज असेल तेथेच युती' या धोरणासह भाजप कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य आणत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष जाहीर झालेल्या निवडणुका काही ठिकाणी एकत्र लढत आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात मात्र



कार्यकर्त्यांना निवडणूक ही स्वतंत्र लढावी अशी स्थिती आहे. याबद्दल जिल्हाध्यक्ष पांडुरंग तांगडे पाटील यांना विचारले असता ही कार्यकर्त्यांची निवडणूक हे स्वाभाविक आहे

जिल्ह्यात नऊपैकी सहा आमदार आणि एक खासदार हे सध्या शिंदेसेनेच्या (शिंदे गट शिवसेना) ताब्यात आहेत. लोकसभा मतदारसंघही शिंदेसेनेकडे आहे. जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघ (छत्रपती संभाजीनगर मध्य, पश्चिम, पैठण, वैजापूर, कन्नड, सिल्लोड) हे शिंदेसेनेच्या ताब्यात आहेत, तर भाजपकडे छत्रपती संभाजीनगर पूर्व विधानसभेसह फुलंब्री आणि गंगापूर-खुलताबाद हे मतदारसंघ आहेत. या पार्श्वभूमीवर भाजपने मुसंडी मारण्यासाठी मंत्री अतुल सावे यांच्यावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा भार सोपवून स्वबळाचा स्पष्ट संकेत दिला आहे. यामुळे शिवसेनेला हे एक प्रकारचे आव्हानच आहे.

आक्रमक व जुळवून घेण्याचे धोरण

सिल्लोड : सिल्लोड नगरपालिकेसाठी भाजप आक्रमक भूमिका घेणार आहे. कन्नड : संतोष कोल्हे यांचा प्रभाव लक्षात घेता, कन्नड नगरपालिकेत मात्र गरज पडल्यास जुळवून घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. भाजपची शक्ती जेथे कमी आहे तेथेच युतीसंबंधी विचार सुरू आहे. त्यामुळे सावे यांची निवड स्वबळासाठी मोठा संकेत समजला जातो.

हुकमी एक्के व मजबूत नेतृत्व

वैजापूर : डॉ. दिनेश परदेशी यांच्या परतण्यामुळे भाजपला हुकमी एक्का मिळाला आहे.

गंगापूर-खुलताबाद : आमदार प्रशांत बंब असल्याने येथे भाजपला फारशी चिंता नाही.

पैठण : माजी नगराध्यक्ष सुरेश लोळगे यांच्यावर भाजप पुन्हा एकदा डाव खेळू शकतो.

फुलंब्री : फुलंब्री नगरपंचायतसाठी विद्यमान नगराध्यक्ष आणि भाजपचे जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाट यांच्यावर पक्षाची मदार आहे.

माळशेज नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, ठाणे
नोंदणी क्र.: टि.एन.ए./(टि.एन.ए.)/ आर.एस.आर./(सी.आर.)/१३७४/सन २००२
मुख्य कार्यालय
गाळा नं. १०२, १०३, ११३, अशोक इंडस्ट्रीयल इस्टेट, एल.बी.एस मार्ग, जरीमरी मंदिर समोर, नवनित मोटार शेजारी, गोकुळनगर, ठाणे (प) ४०० ६०५. * फोन :- ०२२ ६९३०९३५२ / ९८६७००१०४८

शाखा कार्यालय: माजिवाडा * कल्याण * घाटकोपर * कोपरखैरणे * डुंबरवाडी * आळेफाटा * बनकरफाटा * नारायणगांव कारखाना फाटा * मढ-पारगाव * देवठाण * गणोरे * समशेरपुर फाटा

पाहिजेत

संस्थेच्या मुंबई, ठाणे विभागातील शाखांकरिता खालील पदांच्या रिक्त जागा भरावयाच्या आहेत. पात्र उमेदवारांनी विहित नमुन्यात, स्वहस्ताक्षरात कागदापत्रांसह संस्थेच्या मुख्य कार्यालयात अर्ज करावे.

अ.क्र.	पद	पात्रता
१.	शाखाधिकारी	उमेदवार इ.१२ वी ते कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा, उमेदवारास संगणक ज्ञान असणे आवश्यक.
२.	लिपिक	

१) मुळ दस्तऐवज पाठवू नये फक्त झेरॉक्स प्रती पाठवाव्यात.
२) संस्थेच्या मुख्य कार्यालयात सकाळी ११ ते २ यावेळेत समक्ष सादर केले तरी चालतील.
३) कागदपत्राची तपासणी करुन मुलाखती तारखा कळविण्यात येतील.
४) ईमेल : malshejpatpedhi@gmail.com
५) नियुक्तीचे सर्व अधिकार संचालक मंडळास असतील.

संचालक मंडळ मान्यतेने
मुख्य कार्यकारी अधिकारी
माळशेज नागरी सहकारी पतसंस्था मर्या., ठाणे

...म्हणून महामुंबईच्या ९ महापालिका भाजपला हव्यात

संपादकीय

मुंबई (३६/६), ठाणे (१८/३), रायगड (६/२), पालघर (६/१) या चार जिल्ह्यांत मिळून ७६ विधानसभेच्या आणि १२ लोकसभेच्या जागा आहेत. शिवाय पुणे (२२/३) आणि नाशिक (१७/३) या दोन जिल्ह्यांत मिळून ३९ विधानसभेच्या आणि ६ लोकसभेच्या जागा आहेत. याचा अर्थ विधानसभेच्या २८८ जागांपैकी ११५, लोकसभेच्या ४८ पैकी १८ जागा फक्त सहा जिल्ह्यांमध्ये आहेत. याशिवाय महामुंबईतील ४ जिल्ह्यांत महानगरपालिका, ५ नगरपरिषदा, ११ ९ नगरपंचायती आणि ३ जिल्हा परिषदा आहेत. ९ महानगरपालिकांचे एकत्रित वार्षिक बजेट १ लाख कोटीचे आहे. ही आकडेवारी पाहिल्यानंतर भाजपला महामुंबईचे चार आणि नाशिक, पुणे का महत्त्वाचे आहे, हे लक्षात येईल. महामुंबईपुरते बोलायचे झाल्यास ठाणे, नवी मुंबई, भिवंडी, कल्याण-डोंबिवली, मीरा-भाईंदर, पनवेल, उल्हासनगर, वसई-विरार आणि मुंबई अशा ९ महानगरपालिकांमध्ये भाजपला स्वबळावर सत्ता हवी आहे. कोणत्याही परिस्थितीत या सर्व ठिकाणी महापौर आणि स्थायी समिती चेअरमनही भाजपचाच कसा होईल, यासाठीची रणनीती भाजपने कधीच आखली आहे. पक्षाचे त्या-त्या मतदारसंघातील प्रभारी म्हणून भाजपने ज्या पद्धतीने नेमणुका केल्या आहेत, त्यावरून त्यांचे हेतू स्वच्छ आणि स्पष्ट आहेत. वनमंत्री गणेश नाईक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी थेट पंगा घेतला. सगळ्यात आधी नाईक यांनी ठाण्यात जनता दरबार भरवला. त्या जनता दरबारात ठाणे शहराच्या शेकडो समस्या लोकांनी मांडल्या. त्यातून भाजपला जे दाखवून द्यायचे होते ते साध्य झाले. त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबईत 'जनता दरबार' घेतला आणि शह-काटशहाचे राजकारण सुरू झाले. नवी मुंबईमध्ये शिंदेसेना आणि गणेश नाईक यांच्या कार्यकर्त्यांमध्ये 'आडवा विस्तू' जात नाही अशी स्थिती आहे. ठाणे एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला मानला जातो. मात्र, त्या ठिकाणी भाजप आमदारांची संख्या कितीतरी जास्त आहे. नवी मुंबई जरी ठाणे जिल्ह्याचा भाग असला, तरी तेथे स्वतंत्र महापालिका, स्वतंत्र पोलिस आयुक्तालय आहे. जिल्हा होण्याची क्षमता नवी मुंबईत आहे. त्या ठिकाणी गणेश नाईक यांनी आजपर्यंत राज्य केले आहे. नवी मुंबईत विविध प्रकारची विकासकामे, आंतरराष्ट्रीय विमानतळ होत आहे. त्यामुळे या शहरावर भाजप आणि शिंदेसेना दोघांनाही आपले वर्चस्व हवे आहे. पालघर जिल्हा वाढवण बंदरामुळे चर्चेत आला आहे. तिसऱ्या विमानतळाची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे. त्यामुळे हा जिल्हा देखील भाजपला स्वतःच्या नियंत्रणाखाली हवा आहे. वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे ठाणे व पालघर जिल्ह्याचे प्रभारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. नाईक यांच्याकडे ठाण्यासह नवी मुंबई, ठाणे ग्रामीण, भिवंडी, मीरा-भाईंदर, उल्हासनगर व कल्याण डोंबिवलीचीही जबाबदारी सोपवली आहे. शिवाय कल्याण डोंबिवलीमध्ये भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हेदेखील आहेतच. नवी मुंबईमध्ये गणेश नाईक यांचे चिरंजीव संजीव नाईक यांच्याकडे निवडणुकीचे प्रमुखपद सोपवून शिंदेसेनेला संदेश देण्याचे काम केले आहे. आ. संजय केळकर यांनी ठाणे शहरात कायम एकनाथ शिंदे यांच्या विरोधी भूमिका घेतली आहे. शिंदे यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प 'आपला दवाखाना' योजनेत झालेल्या गैरव्यवहाराची मालिका केळकर यांनी मांडली होती. त्याशिवाय ठाणे महापालिकेत असणारी अनियमितता, कथित भ्रष्टाचार, बेकायदा बांधकामे हे मुद्दे केळकर यांनी सातत्याने मांडले आहेत. ठाण्यात काँग्रेस, राष्ट्रवादी, उद्धवसेना जेवढी विरोधात बोलणार नाही त्यापेक्षा जास्त विरोधी भूमिका भाजपचे आ. केळकर यांनी सातत्याने घेतली आहे. ठाण्यात भाजपने स्वबळावर लढले पाहिजे, हा मुद्दाही ते सतत मांडत आले आहेत. त्याच आ. केळकर यांची महापालिका ठाणे महापालिकेचे निवडणूक प्रमुख म्हणून भाजपने नियुक्ती करून शिंदेसेनेच्या नेत्यांना अडचणीत आणले आहे.

दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ३३

			2	5	7	6		
	4		6	1				5
5	7				4			8
	1			4				2
	2	9				8	1	
6				2			5	
2			7				8	3
1				6	3		9	
		7	5	8	2			

उत्तर उद्याच्या अंकात

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

सूडोकू क्र. ३२ चे उत्तर

6	8	9	5	4	7	1	2	3
1	4	3	8	9	2	5	7	6
7	5	2	1	3	6	9	4	8
3	1	7	4	2	5	8	6	9
5	2	4	6	8	9	3	1	7
9	6	8	7	1	3	2	5	4
2	3	1	9	7	4	6	8	5
8	7	6	3	5	1	4	9	2
4	9	5	2	6	8	7	3	1

पंचांग	संवत्सर - विश्वावसूनाम	नक्षत्र:पुष्य १८:१७:४७
११ नोव्हेंबर २०२५	अयन- दक्षिणायान	योग:शुभ ०९:४४:१२
शनिवार	मास- कार्तिक	करण:विष्टि ११:३२:४०
विक्रम संवत्- २०८२	ऋतु- सौर हेमंत	करण:बव २३:०९:०९
कार्तिक शके	कृष्ण पक्ष	सूर्य:तुला
संवत्- १९४७	तिथि:सप्तमी २३:०९:०९	चन्द्र:कर्क

उपदेशाचे डोस

तिसरा फटका

काही कामासाठी गावातील शाळेच्या मुख्याध्यापकांना भेटायला गेलो होतो. त्यांच्याशी बोलत असताना एक शिक्षक काही मुलांविरुद्ध तक्रार घेऊन आले. मुख्याध्यापकांनी त्यांची तक्रार ऐकून घेतली. मुलांना आत बोलावले. टेबलाखालून छडी काढली आणि एकेका मुलाच्या हातावर दोन-दोन छड्या मारल्या. शेवटचा मुलगा दोन छड्यानंतर जायला वळला. मुख्याध्यापक म्हणाले, 'थांब' तो थांबला. छडी पुन्हा वर गेली. 'तिसरा फटका' 'आता जा', ते कठोरपणे म्हणाले. मुलगा निघून गेला. थोड्याच वेळात मी बाहेर पडलो, पायऱ्यांजवळ योगायोगाने मला तोच मुलगा दिसला. नकळत माझी उत्सुकता प्रकट झाली. त्याला थांबवून मी विचारले, 'काय रे, मुख्याध्यापकांनी तुला एक छडी अधिक का मारली?' 'ते माझे वडील आहेत', मुलाने उत्तर दिले. 'काय केले होतेस?' मला राहवेना.

'खरं तर मी काहीच केलं नव्हतं. पण शिक्षकांना कसं पटवून देणारं? मग शिस्तीसाठी खाल्ल्या छड्या' मी म्हणालो, 'आता घरी गेल्यावर?' 'घरी यातलं काहीही राहणार नाही कारण मी काही गैर केलं नाही हे बाबांना नक्कीच माहीत आहे. तेवढा विश्वास मी कमवला आहे. मी तसं उत्तर देऊ शकलो असतो पण त्यांची शिस्त मोडणं म्हणजे त्यांचा अपमान झाला असता. आमचा दोघांचाही एकमेकांवर गाढा विश्वास आहे.' मुलाचे बोलणे ऐकून मला त्याचा अभिमान वाटला.

कथा उपदेश : आई-वडिलांच्या शिस्तीचा आदर करा.

इतिहासात आजचा दिवस

आंतरराष्ट्रीय

- २००६ - तामिळ युनायटेड लिबरेशन फ्रंटचे अध्यक्ष वीरसिंहम अनादासांगारी यांना सहिष्णुता आणि अहिंसाला चालना देण्यासाठी युनेस्को मदनजीत सिंह पुरस्काराने गौरविण्यात आले.

राष्ट्रीय

- १६७५ - शीखधर्मियांना दहशत बसावी म्हणून औरंगजेबाने शिखांचे नववे गुरु तेगबहादूर यांचा भर चौकात सर्व लोकांसमक्ष वध केला.
- २००७ - मुळशी येथील लेखक संजय दुधाणे यांनी देशाचे प्रथम ऑलिंपिक पदक विजेते खाशाबा जाधव यांच्या जीवनावर लिहिलेल्या पुस्तकाचे भारत सरकारच्या नॅशनल बुक ट्रस्टच्या वतीने (एनबीटी) देशातील १६ प्रादेशिक भाषांमध्ये भाषांतर करण्यात आले.

जन्म

- १०५० - हेन्री चौथा, पवित्र रोमन सम्राट.
- ११५४ - सांचो पहिला, पोर्तुगालचा राजा.
- ११५५ - आल्फोन्सो आठवा, कॅस्टिलचा राजा.
- १७४८ - कार्लोस चौथा, स्पेनचा राजा.
- १८६९ - व्हिकटर इम्मॅन्युएल तिसरा, इटलीचा राजा.
- १८७८ - स्टॅनली स्नूक, दक्षिण आफ्रिकेचा क्रिकेट खेळाडू.

निधन

- ०५३७ - पोप सिल्व्हेरियस.
- १८८० - नेड केली, ऑस्ट्रेलियन दरोडेखोर.
- १९१७ - लिलिउओकलानी, हवाईची राणी.
- १९१८ - जॉर्ज लॉरेंस प्राइस, शेवटचा बळी.

दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ३३



आडवे शब्द

१. सीता
४. विश्रांती
६. शंकराचे एक नाव
८. अश्रूची चव
११. चणचण
१३. छोटासा
१४. वर्ष, सन
१५. संभाजीराजांचे धाकटे बंधु
१८. हेळसांड, दुर्लक्ष
१९. मृत
२१. जमीन, देश इ.
२२. समुद्राचा आवाज
२३. आश्चर्य
२५. कोवळी फांदी
२७. सांगणे
२८. संपूर्ण
३१. भ्रमर
३२. एक चतुर्थांश भाग
३३. माणुसकी
३४. ढीग
३६. प्राण
३८. थाट, ऐट, झोक
४०. नृत्याचा एक प्रकार, लवून केलेला नमस्कार
४१. साडी
४२. उन्हाळी सुगंधी पांढरे फूल
४४. आरपार जाणारी (नजर)
४६. पानाचा 'मीठा' प्रकार
४८. मध्यस्थ
४९. किंमत
५०. परिचय
५२. औषध
५५. छान गरगागरम
५७. डोंगरवाट
५८. हिंदुस्तान
६०. लाकूड छिलण्याचे हत्यार
६२. पँट
६२अ. बोटावरील कडक भाग
६३. महिरप
६५. अस्थिर, हलणारे
६६. घरची जबाबदार व्यक्ती
६७. सततचे नामस्मरण
६८. चौक
६९. निकट, जवळ
७१. पत्र
७३. मोटरसायकलला मराठी शब्द
७४. गवंडी
७५. चिंचेचे दाट पाणी
७६. मत्स्य, मीन
७७. लोणच्यातील द्रव मसाला
७८. कावळा
७९. होकारच्या विरुद्ध
८०. चकचकीत
८१. पोपट
८२. आठवण

उभे शब्द

२. मंदिर
३. खालच्या दर्जाचे
५. रात्रीच्या रात्रीच
६. अनेकांनी म्हटलेले गीत
७. वर्तुळ
८. घराणे
९. फळातील द्रव
१०. शेंगेचे आवरण
१२. वाहणारी हवा
१४. चाणक्यनीती
१६. वाईजवळच्या ह्या खोऱ्यात शिवाजीराजांनी अफजल खानला ठार मारले
१७. दुसऱ्याच्या मनातील भाव जाणणारा
१८. पुरुष
१८अ. यज्ञ, होम
२०. थेट, सरळ
२४. सिंह
२६. जय पराजय
२८. वर्ष, साल
२९. नगण्य किंमत
३०. वेल, वल्लरी
३३. संपत्ती
३५. निष्णात, पटाईत
३७. सततची हालचाल
३९. टप्प्याटप्प्याने
४०. इच्छा (हिंदी)
४१. साखरेचा रस
४३. खिडकी, ४५. दार
४७. केव्हा (ग्रामीण)
५०. रांग
५१. रिकाम्या तिजोरीचा आवाज
५३. मूल
५४. पुष्पदल
५६. ताटातूट
५८. वजन, बोजा
५९. तात्काळ
६०. बुटका, बटु
६१. पंजाबातील एक नदी
६२. नव्वद अंशापेक्षा मोठा कोन
६४. मालाची विक्री
६८. अपशकुन
७०. ठिबकणारा
७२. संगोपन करणारा
७३. तफावत, अंतर
७४. राक्षस
७६अ. दागिना
७७. चानी

शब्दकोडे क्र. ३२ चे उत्तर

आडवे उत्तर : १.विकृत ३.शककर्ता ५.सत्र न्यायाधीश ९.नात १०.वात्सल्य ११.कच्चा १२.हार १३.विघ्नहर्ता १५.भूणभूण १६.अरी १७.पथ १८.तहहयात १९.सार २०.बरोबर २२.पूकार २४.यातायात २५.जल २६.अपूर्व २८.सहाध्यायी ३१.सपक ३३.पागा ३४.उजाड ३५.भकास ३७.रद ३८.दारवठा ४०.पुजारी ४२.जरतर ४३.साठेबाजी ४५.मात ४६.आवक ४८.तट ५०.वत ५१.पत ५२.कागाळी ५३.संतान ५५.रमा ५७.मीमांसा ५८.निकामी ५९.सागर ६०.श्री ६१.कोरकु ६३.नकार ६५.अकबार ६७.सवा ६८.गरम ६९.टापू ७०.कारस्थान ७२.राज ७३.राका ७६.काना ७७.आईजीच्या जीवावर बाईजी उदार

उभे उत्तर : १.विनाविलंब २.कृतघ्न ३.शल्य ४.कळण ५.सच्चा ६.न्याहारी ७.यार ८.शपथ १०.वार्ताहर ११.कणव १४.हतबल १५.भूतपूर्व १६.अनुयायी १७.परत परत १९.सायास २१.रोजगार २३.रसभरीत २६.अजा २७.पूड २९.हाका ३०.ध्यास ३२.कदरदान ३३.पादाक्रांत ३४.उठाठेव ३६.रजक ३९.वसा ४१.जामात ४४.बातमीदार ४६.आगामी ४७.वळी ४९.टर ५१.पसा ५२.काकाकुवा ५३.संगनमत ५४.तारका ५६.मालक ५८.निरसन ६२.मगर ६४.रजनीनाथ ६५.अपूवाई ६६.बाणा ६६अ.हर ७०.काजवा ७१.स्थावर ७२.राजी ७३.राई ७४.काजी ७५.अदा

डॉ. विद्या कावरे पारनेरच्या नगराध्यक्ष

- महाविकास आघाडीची बाजी
- खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब
- महायुतीचा घोडेबाजार फसला

पारनेर : (समर्थ गांवकरी)

पारनेर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीने दमदार विजय मिळवला आहे. आघाडीच्या डॉ. विद्या बाळासाहेब कावरे यांनी ११ विरुद्ध ६ मतांनी विजय संपादन करत नगराध्यक्षपद पटकावले. त्यांच्या विजयाने महायुतीच्या राजकीय घोडेबाजाराला चपराक बसली असून, खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब झाले आहे. नगराध्यक्ष नितीन अडसूळ यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या पदासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशीया यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी (दि. १० नोव्हेंबर) विशेष सभा घेण्यात आली. उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर हे पीठासीन अधिकारी म्हणून उपस्थित होते. हात वर करून मतदान पद्धतीने झालेल्या या निवडणुकीत डॉ. कावरे यांनी सहज विजय मिळवला. महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी एकदिलाने मतदान करून पक्षनिष्ठा अबाधित ठेवली. नितीन अडसूळ, जायदा शेख, सुरेखा भालेकर, योगेश मते, भूषण शेलार, प्रियंका औटी, निता औटी, सुप्रिया शिंदे, हिमानी नगरे, विद्या गंधाडे आणि स्वतः डॉ. कावरे यांनी मतदान करून डॉ. कावरे यांचा विजय निश्चित केला. विरोधी उमेदवार अशोक चेडे यांना विजय सदाशीव औटी, युवराज पठारे, निता ठुबे, नवनाथ सोबले आणि कांताबाई ठाणगे या नगरसेवकांचा पाठिंबा मिळाला. महायुतीकडून महाविकास आघाडीच्या नगरसेवकांना 'गळाला लावण्यासाठी' मोठे आर्थिक आमिष दाखवण्यात आले. लाखो रुपयांच्या ऑफर्स देत मतदानावर परिणाम करण्याचे प्रयत्न शेवटच्या क्षणापर्यंत सुरू होते.

अकोले : अकोले येथील प्रतिष्ठित व्यावसायिक आणि समाजप्रिय व्यक्तिमत्त्व श्री. मनोज गायकवाड यांचे चिरंजीव अभिषेक व सावळीविहीर येथील श्री. राजेंद्र भागवत यांची कन्या निकिता यांचा विवाह सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तसेच दैनिक समर्थ गांवकरी चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे उपस्थित राहून नवविवाहित अभिषेक आणि निकिता यांना भावी वैवाहिक आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात नातेवाईक, मित्रपरिवार, सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. वातावरणात आनंद, मंगलमयता आणि शुभेच्छांचा वर्षाव जाणवत होता.

थोडक्यात बातम्या...

आरोग्य शिबिर संपन्न; डॉ. शशिकांत केळशीकर यांचा स्तुत्य उपक्रम

ठाणे, दिवा (स. गांवकरी) : भारतीय जनता पार्टी दिवा शिळ मंडळ आणि डॉ. अग्रवाल डोळ्यांचे हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सदर शिबिरात मोठ्या संख्येने नागरिकांनी नेत्र तपासणी करून घेतली तसेच अनेक आवश्यकता असलेत्यांचे मोतीबिंदू शास्त्रक्रियेची नोंदणी करण्यात आली. सदर उपक्रमाचे आयोजन भाजप युवा मोर्चाचे सरचिटणीस शशिकांत (सतीश) मनोहर केळशीकर यांच्या पुढाकाराने करण्यात आले. प्रसंगी या कार्यक्रमास भाजपचे माजी ठाणे जिल्हा अध्यक्ष संजय वाघुले यांच्यासह मनोहर सुखदरे, प्रशांत कळंबटे, दिवा शीळ मंडळ अध्यक्ष सचिन भोईर तसेच कमलाकर पाटील, विनोद भगत, रोशन भगत, महिला मोर्चा अध्यक्षा सपना रोशन भगत, गणेश भगत, सीमा भगत, विजय भोईर, अशोक पाटील, नरेश पवार, रेश्माताई पवार, प्रफुलजी साळवी, नितीन कोरगावकर, रवी मुननकर, विठ्ठल गावडे, प्रकाश पाटील आदी सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच दत्ता कोलते, संजय सिंग, नीलम मिश्रा, जिलाजीत तिवारी, राकेश पंडित आदी उपस्थित होते.

येळेगाव प. स. गणातून काँग्रेसकडून अरविंद क्षीरसागर इच्छुक

अर्धापूर (स. गांवकरी) : येळेगाव पंचायत समिती गणातून अरविंद क्षीरसागर यांनी निवडणूक लढविण्यासाठी कॉंग्रेस पक्षाकडे उमेदवारी अर्ज भरून मागणी केली आहे. येळेगाव पंचायत समिती गणात येळेगाव,खैरगाव,अमराबाद,अमराबाद तांडा,बारसगाव,बेलसर,आंबेगाव,पाटणूर,चेनापूर नऊ ग्राम पंचायती असुन या गणातून कॉंग्रेसच्या वतीने अरविंद क्षीरसागर यांनी आपली उमेदवारी मागणी केली आहे.या गणात सर्वांशी संपर्क असलेले तरूण अरविंद क्षीरसागर यांना उमेदवारी देऊन निवडणूक लढविण्याची संधी द्यावी अशी मागणी होत आहे.

कुष्णूर पंचायत समिती गणातून नागार्जुन मांडणीकर यांनी निवडणूकीसाठी इच्छुक

नायगाव (स. गांवकरी) : नायगाव तालुक्यातील आगामी जिल्हा बरबडा व कुष्णुर पंचायत व निवडणुकीसाठी पंचायत समिती तयारीचा धडाका सुरू केले असून पंचायत समिती निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक. हा मतदारसंघ ओपन महिला वर्गासाठी राखीव असल्याची आज अधिकृत घोषणा झाली असून या निर्णयामुळे गटातील राजकीय समीकरणांमध्ये हालचालींना वेग आला आहे. नागार्जुन देविदास मांडणीकर यांनी बांधकाम मजूर अर्वन मल्टिपल निधी लि . मांडणी यांच्या नेतृत्वाखाली अनेक गरजूनां व सहकार्य केले आहे .त्यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि महिला मदत करणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे.

दैनिक समर्थ गांवकरी दिवाळी अंकाचे जुन्नर येथे पत्रकार बांधवांच्या उपस्थितीत प्रकाशन!

जुन्नर : (समर्थ गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील नामवंत उद्योजक, पत्रकार व व्यापारी बांधवांच्या उपस्थितीत दैनिक समर्थ गांवकरी या वृत्तपत्राचा दिवाळी अंकाचा प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात दैनिक समर्थ गांवकरी चे दिवाळी अंक तसेच घड्याळ व पाण्याच्या बाटल्या अशा भेटवस्तूंचे वितरण करण्यात आले. या वेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर तसेच जुन्नर तालुक्यातील नामवंत उद्योजक महेश पाडेकर उपस्थित होते. कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार राजेश डोके, तालुका प्रतिनिधी रवींद्र भोर (आळेफाटा), प्रतिनिधी सुदर्शन मंडले, ज्येष्ठ पत्रकार नयन डोंगरे, पत्रकार रवींद्र गजे यांच्यासह अनेक पत्रकार व व्यापारी बांधव उपस्थित होते. या कार्यक्रमादरम्यान पत्रकार बांधवांमध्ये परस्पर संवाद साधून दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. दैनिक समर्थ गांवकरी च्या दिवाळी अंकातून समाजातील सकारात्मक घडामोडींना चालना मिळावी आणि ग्रामीण पत्रकारितेचा संदेश सर्वदूर पोहोचावा, असा मनोगत व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत उत्साही आणि पारंपरिक वातावरणात करण्यात आले होते.

महानगराध्यक्षपदी रमेश देवडे यांची निवड

नांदेड : (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या नांदेड महानगराध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार रमेश देवडे यांची निवड करण्यात आली आहे. तर कार्याध्यक्षपदी देविदास डांगे, सचिवपदी संतोष कुलकर्णी, उपाध्यक्षपदी संदेश देवके, संघटक दत्तात्रय शेंबाळे, कोषाध्यक्ष विष्णू वाघमारे तसेच सदस्य सुनील बेंद्रीकर यांची निवड करण्यात आली आहे. या नूतन कार्यकारिणीच्या निवडीची पत्रे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे मराठवाडा अध्यक्ष रुपेश पाडमुख आणि जिल्हाध्यक्ष श्रीधर नागापूरकर यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ ही नोंदणीकृत व कार्यक्षम संघटना असून तिची स्थापना संजय भोकरे यांनी केली आहे. राज्य स्तरावर संघटनेचे नेतृत्व मनीष केत हे अध्यक्ष आणि सौ. सुजाता खानोरे राज्य सरचिटणीस या दोघांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड महानगरातील नवी कार्यकारिणी गठीत करण्यात आली आहे. रमेश देवडे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, "पत्रकारांच्या न्याय हक्कांसाठी, त्यांना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी आणि पत्रकारितेतील मूल्यांची जपणूक करण्यासाठी संघ सतत प्रयत्नशील राहील." त्यांनी पुढे सांगितले की, आगामी काळात नवीन सभासद नोंदणी, कार्यकारिणीचा विस्तार आणि पत्रकार हिताच्या उपक्रमांना प्राधान्य दिले जाईल. याप्रसंगी रुपेश पाडमुख, श्रीधर नागापूरकर आणि रमेश पांडे यांनी नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू पावलेल्या कुटुंबाला सामाजिक मदत

एन.के.टी. ट्रस्ट व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा उपक्रम!

अकोले : (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील देवठाण येथील आदिवासी कुटुंबातील शेतकरी लहानु पोपट गांगड यांची कन्या कविता लहानु गांगड हिच्यावर सुमारे महिनाभरापूर्वी बिबट्याने अचानक हल्ला करून तिचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेने संपूर्ण परिसर हळहळला होता. या दुःखद प्रसंगात गांगड कुटुंबाला धीर व आर्थिक आधार मिळावा, यासाठी नुकतीच एन. के. टी. ग्रुपचे अध्यक्ष, ज्येष्ठ समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉ.विश्वासराव आरोटे यांच्या वतीने या कुटुंबाला भेट देऊन आर्थिक मदत तसेच किराणा साहित्य प्रदान केले.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस आणि दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर, माळशेज नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक श्रीकांत सहाने, प्रगतशील शेतकरी ललित मोहन शेळके व माळशेज नागरी पतसंस्थेचे शाखा अधिकारी भास्कर पथवे आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. विश्वासराव आरोटे यांनी या प्रसंगी बोलताना सांगितले की, "आपत्कालीन काळात आणि दुःखद प्रसंगी गरजूंपर्यंत मदतीचा हात पोहोचवणे हे आमचे सामाजिक कर्तव्य आहे.

फुला फुलाची पाकळी देऊन जरी का होईना, आम्ही या कुटुंबाला आधार देण्याचा प्रयत्न करीत आहोत." ते पुढे म्हणाले की, "गांगड कुटुंब अत्यंत गरीब असून त्यांच्या कुटुंबातील मुलीचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यानंतर त्या दुःखात आम्ही सहभागी होऊन ठाणावाला यांच्या प्रेरणेने ही मदत केली.

मदतीची रक्कम मोठी नसली तरी दुःखात दिलासा देणे हेच आमचे खरे कर्तव्य आहे." या सामाजिक उपक्रमातून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाने पुन्हा एकदा आपली सामाजिक जबाबदारी जपल्याचे उपस्थित मान्यवरांनी नमूद केले.

दै. स. गांवकरी दिवाळी अंकाचे आ. डॉ. किरण लहामटे यांच्या हस्ते प्रकाशन!

अकोले : (समर्थ गांवकरी)

ग्रामीण तसेच शहरी भागातील सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडणारे आणि समाजातील प्रत्येक घटकाच्या भावनांना न्याय देणारे "दैनिक समर्थ गांवकरी" या वृत्तपत्राच्या दिवाळी विशेष अंकाचे प्रकाशन अकोले येथे आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरी चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे युवक तालुकाध्यक्ष अक्षय आभाळे, नामवंत उद्योजक गौरव मैड, उपसंपादक निखिल भांगरे, व्यवस्थापक अमोल पुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

ग्रामीण भागातील प्रश्न मांडण्याचे कार्य अनेक वर्षांपासून दैनिक समर्थ गांवकरी या वृत्तपत्राच्या माध्यमातून यशस्वीपणे सुरू आहे. वर्तमानपत्र सुरू करणे व ते दैनंदिन वाचकांपर्यंत पोहोचवणे हा संघर्ष प्रत्येक संपादकासाठी आव्हानात्मक असतो, मात्र "समर्थ गांवकरी" ने सातत्याने ग्रामीण भागातील जनतेच्या अपेक्षा पूर्ण करत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

या प्रसंगी आमदार डॉ. किरण लहामटे म्हणाले, "वर्तमानपत्र हे समाजाचे आरसे असतात. समर्थ गांवकरीने ग्रामीण भागातील प्रश्नांना प्राधान्य देत समाजहिताचे कार्य केले आहे. स्पर्धेच्या युगातही त्यांनी 'नो पेड न्यूज – ओन्ली फ्री ऑफ न्यूज' या धोरणाचा अवलंब करून सर्वसामान्य उमेदवारांना बळ दिले आहे, हे कौतुकास्पद आहे."

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी आमदार डॉ. किरण लहामटे यांचा शाल, पुष्पगुच्छ व घड्याळ देऊन सत्कार केला. त्यांनी या वेळी दिवाळी विशेष अंकाचे वाचन करत हा अंक निश्चितच वाचकांना प्रेरणादायी ठरेल, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन उपसंपादक निखिल भांगरे यांनी केले, तर आभार व्यवस्थापक अमोल पुंडे यांनी मानले.

श्री बाळेश्वर शैक्षणिक व कृषी विकास फाउंडेशन

श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी

मु. माळवाडी पो. बोटा ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ४२२६०२
मो. नं.7588094642/43
Email ID: shrisamarthcop@gmail.com
Approved by PCI, DTE, DBATU, MSBTE & Govt. of Maharashtra

शैक्षणिक पात्रता
एम फार्मसी-बी फार्मसी पास (GPAT आवश्यक)
बी. फार्मसी- १२ वी सायन्स पास CET आवश्यक &
डी. फार्मसी-१२ वी सायन्स पास
प्रवेशसूचना २०२५-२६ (Spot Round)

एम फार्मसी, बी. फार्मसी ॲण्ड डी. फार्मसी प्रथम वर्षाच्या संस्थास्तरावरील (Instititue Level) प्रवेशाकरिता व CAP Round नंतर रिक्त राहणाऱ्या जागांसाठी कॉलेज स्तरावरील प्रवेशा करिता पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरुन अर्ज मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी आपली सर्व ओरीजनल कागदपत्रे घेऊन महाविद्यालयात त्वरीत संपर्क साधावा.

DTE CODE: 05484

अ.क्र	कार्यप्रणाली	दिनांक
१.	कॉलेजस्तरावर अर्ज आणि प्रवेश पत्र स्विकारणे	11/11/2025 ते 17/11/2025
२.	अंतिम गुणक्ता यादी	17/11/2025 Up to 1.00 pm
३.	प्रवेश घेण्याची अंतिम तारीख	17/11/2025 Up to 5.00 pm
४.	शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी सर्व प्रकारच्या प्रवेशांसाठी कट-ऑफ तारीख	17/11/2025 up to 6.00 pm

प्राचार्य
श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी

देगलूरमध्ये दारू दुकानात हत्याकांड

देगलूर : (समर्थ गांवकरी)

दोन तळीरामांमधील किरकोळ वाद रक्तरंजित खुनात परिवर्तित होऊन एका तळीरामाने दुसऱ्या तळी रामाचा कट्टरणे गळा कापून खून केल्याची घटना रविवारी दि.९ नोव्हेबर रोजी सकाळी १०.च्या सुमारास अंबिका ऑईल मिल च्या बाजूस असलेल्या देशी दारू दुकानात घडली. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे. शहरातील अंबिका ऑईल मिलच्या लगतच्या बोळीत सुभाष अनमुलवार यांचे देशी दारू दुकान

असून सध्या हे दुकान अशोक साखरे भाडेतत्त्वावर चालवत आहेत. या देशी दारू दुकानांमध्ये रविवारी सकाळी लाईन गल्ली येथील शेख निसार बाबूमिया वय वर्षे ३० हा दारू पिण्यासाठी आला होता. त्याचवेळी भायेगाव रस्त्यावरील आनंदनगर येथील शेख शादुल सलीमसाब वय वर्षे ४४ हा देखील दारू पिण्यासाठी आला होता दोघेही देशी दारूचे पेग घेत असताना बोलता बोलता किरकोळ वाद झाला. यापूर्वी ही दोघांमध्ये वादावादी झाली असल्याचे सांगण्यात येते त्यामुळे आताचा व पूर्वीचा राग मनात धरून नशेत असलेल्या शादुलने जवळच ठेवलेला भाजीपाला कटर उचलून थेट निसारच्या गळ्यावर वार केला.वार एवढा तीव्र होता की निसार जागीच रक्ताच्या थारोळ्यात कोसळून गतप्राण झाला. घटना घडल्यानंतर देशी दारूच्या मॅनेजरने हत्याकांड करणाऱ्या शादुलला पोलीस ठाण्यात घेऊन आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या कांडची माहिती मिळताच डीवायएसपी संकेत गोसावी, पोलीस निरीक्षक मारुती मुंडे, पोलीस उपनिरीक्षक नरहरी फड, पोलीस उपनिरीक्षक गोपाळ सूर्यवंशी, महिला जमादार रिहाना, विशाल आटकुरे, यांच्यासह डीबी पथकाने घटनास्थळी धाव घेतली आणि पंचनामा करून तपास सुरू केला आहे. या घटनेचा तपास डीवायएसपी संकेत गोसावी, पोलीस निरीक्षक मारोती मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गोपाळ सूर्यवंशी करीत आहेत. शादुलचा गुन्हेगारी इतिहास सदर आरोपी शादुलवर यापूर्वी देखील एका व्यक्तीच्या गळ्यावर चाकूने हल्ला केल्याचा गुन्हा दाखल झाला होता.शादुलच्या अंगी गुन्हेगारी वृत्ती दाटून भरली असल्याची नागरिकांत चर्चा आहे.

जुन्नर : छत्रपती शिवाजी महाराजांची पवित्र जन्मभूमी शिवनेरी किल्ल्याच्या साक्षीने 'दैनिक समर्थ गांवकरी' या वृत्तपत्राचा दिवाळी विशेषांकाचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. ग्रामीण पत्रकारिता, सामाजिक सलोखा आणि जनजागृती या विषयांना वाहिलेल्या या अंकाचे प्रकाशन प्रसंगी पत्रकार बांधव, उद्योजक आणि व्यापारी वर्गाचा उत्स्फूर्त सहभाग होता. कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, आपला आवाज या वृत्तवाहिनीचे संपादक डॉ. अतुल परदेशी, मुंबई विभागीय संपादक दशरथ चव्हाण, महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर, समूह संपादक सौ. परिघा आरोटे आणि समूह संपादक ज्योतीताई चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

थोडक्यात बातम्या...

दिव्यातील भ्रष्टाचार करणाऱ्या रेशनिंग दुकानाचा परवाना रद्द करा - अमोल केंद्रे

ठाणे, दिवा (स. गांवकरी) : रेशनिंगच्या नावाने दिवा शहरातील दुकानदार सामान्य जनतेची लूट करत असून त्यांना मिळणारे राशन कमी प्रमाणात दिले जात असून या संबंधी काही नागरिकांनी धडाकेबाज युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष व समाजसेवक अमोल केंद्रे यांच्याकडे तक्रार आली असता त्यांनी सदर ठिकाणची खरी परिस्थिती जाणून घेण्यासाठी दिवा शहरातील सेंट मेरी शाळेच्या बाजूला असणाऱ्या अधिकृत शिधा वाटप दुकान. क्र.U- MUM ४८ फ ११३ येथे जाऊन पाहणी केली असता. रेशनिंग दुकानदार प्रत्येक व्यक्ती मागे १ किलो राशन कमी देत असल्याचे निदर्शनास आले. घरात पाच व्यक्ती असतील तर त्यांना दहा किलो गहू आणि पंधरा किलो तांदूळ मिळतात परंतु येते तर चक्क पाच किलो राशन कमी दिल्याचे उघडकीस आले. सदर प्रकार दिवा शहरातील प्रत्येक दुकानात सुरू असून ही जनतेची लूट थांबली पाहिजे यासाठी जनतेने हा जाब विचारून पूर्णपणे तुमच्या हक्काचे प्रत्येक व्यक्तीस मिळणारे २ किलो गहू आणि ३ किलो तांदूळ घ्यावे. जो दुकानदार देणार नाही. त्याची तक्रार रेशनिंग ऑफिस येथे करावी किंवा ८६५२१५५३२८ यावर कॉल करून संपर्क करण्याचे आवाहन केले आहे. सदर भ्रष्टाचार बाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सोबत चर्चा करून तात्काळ लायसन्स रद्द करण्याची मागणी समाजसेवक अमोल केंद्रे यांनी केली आहे.

दिव्यांग शिक्षक बाळासाहेब सोनवणे यांना समाजरत्न पुरस्कार जाहीर

■ शिक्षण, समाजसेवा आणि दिव्यांग कार्याची दखल

नाशिक (स. गांवकरी) : निफाड तालुक्यातील मांजरगाव येथील भूमिपुत्र, महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी अधिकारी संघटनेचे विभागीय अध्यक्ष आणि नाशिक तालुक्यातील महिरावणी येथील मातोश्री गिताबाई देवराम पाटील माध्यमिक विद्यालयाचे आदर्श,उपक्रमशील उपशिक्षक बाळासाहेब दादा सोनवणे सर यांची या वर्षीच्या "दै. द सोमेश्वर साथी समाजरत्न पुरस्कार २०२५" या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी निवड झाल्याची गौरवशाली घोषणा करण्यात आली आहे. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह व मानपत्र असे असून या पुरस्काराद्वारे बाळासाहेब सोनवणे सरांचे शैक्षणिक, सामाजिक, दिव्यांग सक्षमीकरण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य गौरविण्यात येत आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण सामाजिक बांधिलकीमुळे आणि शिक्षण व समाजसेवा क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांची निवड अत्यंत योग्य ठरल्याची भावना विविध स्तरांतून व्यक्त होत आहे. हा पुरस्कार समारंभ शनिवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता,शासकीय विशेष अतिथी विश्रामगृह, छत्रपती शिवाजी महाराज चौक, परळी- वैद्यनाथ,जि. बीड येथे भव्य समारंभात पार पडणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून किरण गिते (भा.प्र.से.) सचिव, सार्वजनिक बांधकाम, कुटुंब कल्याण, आरोग्य, माहिती तंत्रज्ञान, उद्योग व पर्यटन विभाग, त्रिपुरा सरकार तसेच इतर अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

हमीभाव खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी सुरू; शेतकऱ्यांना आवाहन

किनवट (स. गांवकरी) : खरीप हंगामातील पिकांच्या हमीभाव खरेदीसाठी राज्य शासनाच्या वतीने १५ नोव्हेंबर पासून शासकीय खरेदी केंद्रांवर सोयाबीनची खरेदी सुरू होणार आहे. या खरेदी प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांनी किनवट-माहूर मार्गावरील किनवट तालुका कृषीमाल प्रक्रिया सहकारी संस्था, गणेशपूर या खरेदी केंद्रात येऊन ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन संस्थेचे चेअरमन रवी तिरमनवार यांनी केले आहे. जिल्हा मार्केटिंग कार्यालय, नांदेड (महाराष्ट्र शासन) यांच्या मंजुरीनुसार किनवट तालुका कृषीमाल प्रक्रिया सहकारी संस्था, गणेशपूर ही सध्यातरी तालुक्यात नाफेडमार्फत हमीभावाने सोयाबीन खरेदी करणारी एकमेव संस्था आहे.

म्हसणे फाट्यावर वाहतूक सिग्नल बसवा : खासदार नीलेश लंके यांची मागणी

पारनेर : (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर-पुणे महामार्ग हा जिल्ह्यातील सर्वाधिक वर्दळीचा मार्ग ठरत असून, या मार्गावरील म्हसणे फाटा परिसर गंभीर वाहतूक समस्येचा केंद्रबिंदू बनला आहे. दररोज हजारो वाहनांची वर्दळ, नियंत्रणाची कमतरता आणि वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वाहतूक सिग्नल बसविण्याची मागणी केली आहे. अहिल्यानगर-पुणे हा केवळ जिल्ह्याचाच नव्हे तर राज्याच्या दृष्टीने महत्त्वाचा राष्ट्रीय महामार्ग

आहे. या महामार्गावर म्हसणे फाटा हे ठिकाण शहराच्या मध्यवर्ती भागाशी ग्रामीण भागाला जोडणारे प्रमुख चौक आहे. दररोज सकाळ-संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी येथे वाहनांची संख्या काही हजारांच्या घरात असते. मात्र, सिग्नल व्यवस्था नसल्यामुळे वाहतुकीचे नियंत्रण पूर्णतः कोलमडले आहे. अनेकदा चार दिशांतून वाहने एकाच वेळी रस्ता ओलांडण्याचा प्रयत्न करत असल्याने वाहतुकीची कोंडी, आणि अपघातांची शक्यता वाढली आहे. या चौकातून अनेक शाळा आणि महाविद्यालयांकडे जाणारी वाहतूक होते. त्यामुळे विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना रस्ता ओलांडताना मोठा धोका निर्माण झाला आहे.

स्थानिक नागरिकांचीही मागणी

या भागातील नागरिक, व्यापारी व प्रवासी संघटनांनीही गेल्या काही महिन्यांपासून या विषयावर सातत्याने आवाज उठवला आहे. दर आठवड्याला होणाऱ्या अपघातांमुळे जनतेत भीतीचे वातावरण आहे. "दररोज सिग्नल नसल्यामुळे वाहनं अराजकपणे धावत असतात. शाळकरी मुलांना रस्ता ओलांडताना जीव मुठीत घेऊन चालावे लागते," अशी भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली.त्यामुळे खासदारांनी या मागणीस संस्थात्मक रूप देऊन विभागाकडे अधिकृत प्रस्ताव पाठविल्याने नागरिकांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत आहे.

बांधकाम विभागाला खा. लंके यांचे पत्र

बीनया विषयावर खासदार निलेश लंके यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांना पत्राद्वारे मागणी केली आहे. पत्रात म्हटले आहे की, "अहिल्यानगर-पुणे महामार्गावरील म्हसणे फाटा येथे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतूक नियमनासाठी सिग्नल बसविण्याची आवश्यकता आहे. स्थानिक पोलीस विभाग, आणि आपल्या विभागामार्फत संयुक्त समन्वयातून तातडीने निर्णय घ्यावा."तसेच, सदर प्रस्तावावर त्वरित कार्यवाही करून अहवाल सादर करावा, अशी अपेक्षा त्यांनी पत्राद्वारे व्यक्त केली आहे.

शेतकऱ्याची विष पिऊन आत्महत्या

मुरबाड : (समर्थ गांवकरी)

परतीच्या प्रवासाने तालुक्यातील शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले असून शेतकऱ्याचे हातातोंडाशी आलेला घास हिरावला जात असल्याने तालुक्यातील जायगाव येथील एका ५२ वर्षे शेतकऱ्याने तण नाशक हे विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली आहे. शेतकऱ्यांना अद्यापही नुकसान भरपाई मिळाली नसल्याने कष्टकरी शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. महाराष्ट्रात झिनी या सुप्रसिद्ध लहान चवदार तांदळासाठी सुप्रसिद्ध असणाऱ्या मुरबाड तालुक्यातील शेतकऱ्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे.बहुतेक शेतकरी वर्षातुन एकच पिक घेत असल्याने तो वर्षभर काबाडकष्ट करून मिळालेल्या उत्पन्नातून आपल्या परिवाराला लागेल ते धान्य ठेऊन घेतो आणि राहिलेले धान्य विकून त्यावर आपल्या परिवाराची गुजराण करतो.यावर्षी समाधानकारक पावसामुळे शेतकऱ्याला भरघोस पिक आले होते.हा हातातोंडाशी आलेला घास केव्हा एकदा शेतातुन खळ्यात येतो आणि खळ्यातुन घरात येतो या विवंचनेत शेतकरी असताना परतीच्या प्रवासाने मात्र धुमाकूळ घातल्याने शेतकऱ्याचे हातातोंडाशी आलेले पिक पावसात भिजून ते खाण्यालायक राहिले नसल्याने आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह कसा करायचा या विवंचनेत शेतकरी सापडलेला आहे.

तळवली चौकी, वडपा, गंगाराम पाडा परिसरात धुळीचा त्रास

■ नागरिकांचे आरोग्य धोक्यात

भिवंडी : (समर्थ गांवकरी)

मुंबई-नाशिक महामार्गावरील तळवली चौकी, वडपा आणि गंगाराम पाडा या भागांत सध्या महामार्गाच्या दुरुस्तीची कामे सुरू आहेत. या कामांदरम्यान रस्त्याच्या कडेला खोदलेली व साचवून ठेवलेली माती, तसेच अपूर्ण राहिलेल्या खड्ड्यांमुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर धूळ उडत आहे. परिणामी स्थानिक नागरिक आणि प्रवाशांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून, नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. दुपारच्या वेळी विशेषतः ट्रक, कंटेनर आणि इतर वाहनांच्या वर्दळीमुळे धूळ

हवेत मिसळते आणि संपूर्ण परिसर धुकट दिसू लागतो. ही धूळ घरात, दुकानात आणि अन्नपदार्थांमध्ये साचत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. "गेल्या काही दिवसांपासून रस्त्यावरील धूळ इतकी वाढली आहे की, मुलांना आणि वृद्धांना श्वास घेणे अवघड झाले आहे. अनेकांना खोकला, दमा, सर्दी आणि छातीत जळजळ होण्याच्या तक्रारी निर्माण झाल्या आहेत. रस्त्याचे काम सुरू झाले हे स्वागतार्ह आहे, पण त्याचवेळी धूळ नियंत्रणासाठी टँकरने नियमित पाणी मारावे. अन्यथा हे काम नागरिकांसाठी आरोग्य धोक्याचे ठरेल." असे स्थानिक नागरिकांनी सांगितले. रस्त्याच्या कडेला साचवून ठेवलेल्या मातीकडे दुर्लक्ष झाल्याने वाऱ्याने ती उडून परिसरात पसरण्याचे प्रकार सतत दिसत आहेत.

धुळीमुळे दुपारच्या सुमारास वातावरण ढगाळ झाल्यासारखे दिसते आणि दृष्टीक्षेपात अडथळा निर्माण होतो. ही परिस्थिती वाहतूक आणि पादचाऱ्यांसाठीही धोकादायक ठरत आहे.

"धुळीमुळे आणि धुक्यामुळे सर्दी-खोकला तसेच श्वासाचे त्रास वाढले आहेत. रुग्णसंख्येत वाढ दिसून येत आहे."
- डॉ. निखिल जोगळेकर, पडघा प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकीय अधिकारी

आदर्श इंजिनिअरिंग तर्फे वाहतूक विभागाला भेटवस्तूंचे वितरण

■ सेवाभावी कर्मचाऱ्यांचा गौरव!

नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)

समाजातील सेवाभावी आणि जबाबदार कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस मॅनेजिंग डायरेक्टर दशरथ चव्हाण यांच्या मागदर्शनाखाली नवी मुंबईतील वाहतूक विभागातील कर्मचाऱ्यांना भेटवस्तूंचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमात पाण्याच्या बाटल्या, पेन, कीचेन तसेच दैनिक

समर्थ गांवकरी प्रत असे साहित्य वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम नवी मुंबईच्या महापे, खारघर तसेच इतर वाहतूक विभागातील कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला. वाहतूक विभागातील कर्मचारी ऊन असो, वारा असो वा पाऊस असो — जनतेच्या सुरक्षेसाठी, वाहतुकीच्या शिस्तीसाठी आणि नागरिकांच्या सोयीसाठी नेहमीच रस्त्यावर तैनात असतात. त्यांच्या या निःस्वार्थ सेवाभावाचा गौरव करण्याच्या हेतूने आदर्श इंजिनिअरिंगने हा अभिनव उपक्रम हाती घेतला.

या सामाजिक उपक्रमाबद्दल वाहतूक विभागातील कर्मचाऱ्यांनी आनंद व्यक्त करत आदर्श इंजिनिअरिंगचे आभार मानले. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी वाहतूक विभागाचे योगदान महत्त्वाचे असून, अशा सन्मान उपक्रमांमुळे कर्मचाऱ्यांना प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळते, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

जोर्वे गटात थोरातांना पुन्हा 'दे धक्का'!

संगमनेर : (समर्थ गांवकरी)

संगमनेर तालुक्यातील जोर्वे गट हा आतापर्यंत माजी आमदार बाळासाहेब थोरात यांचा बालेकिल्ला मानला जात होता. मागील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत थोरात गटाचेच वर्चस्व कायम होते. मात्र आगामी निवडणुकांची चाहूल लागल्याने आता या गटात मोठी गळती सुरू झाली आहे. नुकत्याच आश्वि येथे झालेल्या कार्यक्रमात राज्याचे जलसंपदा मंत्री आणि अहिल्यानगरचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत वाघापूर येथील थोरात कारखान्याचे माजी संचालक बाळासाहेब शिंदे यांसह अनेक कार्यकर्त्यांनी थोरात गटाला सोडचिठ्ठी देत विखे गटात प्रवेश केला होता. या धक्क्यातून थोरात गट सावरत नाही तोच आता आणखी मोठा धक्का बसला आहे. पिंपरने येथील कामधेनू दूध संस्थेचे चेअरमन व दलित चळवळीचे नेते प्रकाश उर्फ काका गायकवाड, सरपंच नारायण मरभळ, ग्रामपंचायत सदस्य उत्तम राहिंज, निलेश चत्तर, श्रीकांत बागुल, तसेच सामाजिक कार्यकर्ते राहुल बागुल, नानासाहेब गायकवाड, सुरेश गाडेकर, प्रशांत राहिंज, शुभम राहिंज यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे.

वंदे मातरम् प्रतिष्ठित राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापन दिन साजरा

नारायणगाव : (समर्थ गांवकरी)

ग्रामोन्नती मंडळाच्या कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नारायणगाव येथे वंदे मातरम् ह्या प्रतिष्ठित राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापन दिन साजरा करण्यासाठी छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.यामध्ये पोस्टर तयार करणे, निबंध लेखन अश्या स्पर्धा राबवण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये एकुण 40 कॅडेट ने सहभाग घेतला. ह्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सी.क्यू.एम समृद्धी जगताप व कॉर्पोरेल सानिका भुजबळ यांनी केले, व सर्व प्रथम मानसशास्त्र व राष्ट्रीय छात्र सेना विभाग प्रमुख डॉ. कॅप्टन दिलीप शिवणे यांनी गुन्हे अन्वेषण विभागाचे महादेव शेलार सर व महाराष्ट्र पोलिस दलाचे



सुदर्शन माताडे यांचा पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन सत्कार केला. प्राचार्य डॉ.आनंद कुलकर्णी यांनी कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाची प्रस्तावना ज्युनिअर अंडर ऑफीसर साक्षी गायकवाड हिने केले.आणि कॅडेट व प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली.यावेळी गुन्हे अन्वेषण विभागचे श्री महादेव शेलार सर , महाराष्ट्र पोलिस दलाचे श्री सुदर्शन मटाडे सर ,मानसशास्त्र विभाग प्रमुख व एनसीसी विभाग प्रमुख डॉक्टर कॅप्टन दिलीप शिवणे सर आणि सोबतच छात्र सेनेचे एकूण साठ छात्र उपस्थित होते. नंतर गुन्हे अन्वेषण विभागचे श्री महादेव शेलार सर यांनी छात्र सेनेच्या कॅडेट्सला मार्गदर्शन केले, एन सी सी करणे का गरजेचे आहे आणि ह्याचा आपल्याला भविष्यात काय फायदा होतो ह्याची माहिती त्यांनी दिली.सोबतच त्यांनी जीवनात केलेला संघर्ष आणि जीवनात संघर्ष किती महत्त्वाचा आहे ह्याचे मोलाचे मार्गदर्शन , एन सी सी ही विद्यार्थ्यांना मोठ मोठे अधिकारी घडवण्याचे काम करते तसेच त्यांनी स्वतःचा अधिकारी बनण्यापर्यंतचा प्रवास व त्याचा अनुभव हा कॅडेट समोर मांडला. नंतर पोस्टर बनवा व निबंध लेखन अश्या ज्या स्पर्धा घेतल्या होत्या.त्यामध्ये ज्या कॅडेट ने क्रमांक मिळवला होता अशा कॅडेटचा महादेव शेलार सर व सुदर्शन माताडे यांच्या हस्ते मेडल देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रथम पोस्टर बनवा या स्पर्धेत प्रथम तीन क्रमांक ज्या कॅडेटचा क्रमांक आला त्यामध्ये प्रथम क्रमांक कॉर्पोरेल नशरा मलिक,द्वितीय क्रमांक कॅडेट कृष्णा बारवे व तृतीय क्रमांक कॅडेट वैष्णवी थोरात यांचा आला व निबंध लेखन मध्ये प्रथम क्रमांक कॅडेट श्रावणी अडसरे, द्वितीय क्रमांक कॅडेट श्रावणी शिंदे, तृतीय क्रमांक सेजल चनोदिया यांचा आला,व पुणे मुख्यालय पुणे येथे झालेल्या कम्बाईन वार्षिक शिबिर संपन्न झाले.त्या शिबिरामध्ये नारायणगावच्या मुलीने खो खो प्रथम क्रमांक तर रस्सीखेच मध्ये द्वितीय क्रमांक मिळवल्याबद्दल त्या कॅडेटचा देखील सत्कार करण्यात आला. खो खो ह्याचे नेतृत्व समृद्धी जगताप हिने केले आणि रस्सीखेच चे नेतृत्व कॅडेट दिव्या घायतडके हिने केले होते.नंतर वंदे मातरम् या प्रतिष्ठित राष्ट्रीय गीत सादर केले,कार्यक्रमाचे कॉर्पोरल नशरा मलिक हिने आभार मानले, कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन मानसशास्त्र विभाग प्रमुख व छात्र सेना विभाग प्रमुख डॉ. कॅप्टन दिलीप शिवणे सर यांनी केले होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

गड किल्ले बांधणी स्पर्धेत तिसाई मित्र मंडळ ठरले प्रथम विजेते

ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)

भाजपा महिला मोर्चा अध्यक्षा सौ सपना रोशन भगत आणि आदर्श मित्र मंडळ आयोजित दिवाळी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य गड किल्ले बांधणी स्पर्धेचा बक्षिस समारंभ रविवार दिनांक 9 नोव्हेंबर 2025 रोजी दिवा शहरातील ग्लोबल शाळेच्या भव्य मैदानावर शिवप्रेमींच्या आणि दिव्यातील तमाम जनतेच्या प्रचंड उपस्थित मोठ्या उत्साहात दिमाखदार सोहळा पार पडला. प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले तिसाई मित्र मंडळ गणेश पाडा ,शिवबा राजे प्रतिष्ठान बेडेकर

नगर आणि अचानक मित्रमंडळ साबेगाव हे सयुक्त रित्या द्वितीय क्रमांकाचे मानकरी ठरले, क्षत्रिय कुलवंतस प्रतिष्ठान आगासन आणि नवतरुण मित्र मंडळ बेडेकर नगर हे तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले, गडप्रेमी ग्रुप वक्रतुंड नगर आणि काळूबाई मित्र मंडळ म्हात्रे गेट हे चतुर्थ क्रमांकाचे मानकरी ठरले तर शिवप्रेरणा ग्रुप नाईक नगर आणि गावदेवी चाळ बेडेकर नगर यांना ही पाचवा क्रमांक विभागून देण्यात आला. सदर भव्य दिव्य गड किल्ले बांधणी बक्षिस समारंभात दिवा भाजप महिला मोर्च्याच्या अध्यक्षा सपना भगत व रोशन भगत यांनी अनेक शिवप्रेमी संघटना व सामाजिक संघटनासह राजकीय मान्यवरांचे अभिनंदन व स्वागत केले. प्रसंगी ठाणे जिल्हा मा. अध्यक्ष संजय वाघुले, ठाणे जिल्हा सरचिटणीस मा. मनोहर सुखदरे ,भाजपा ठाणे जिल्हा उपाध्यक्ष विजय भोईर, ठाणे भाजपा सरचिटणीस विक्रम भोईर, भाजपा दिवा मंडळ अध्यक्ष सचिन भोईर, दिलीप भोईर, अंकुश मढवी, रेश्मा पवार, नरेश पवार, जयदीप भोईर, श्रीधर पाटील, समीर चव्हाण, जिलाजीत तिवारी, नितीन कोरगांवकर, प्रकाश पाटील, रवी मुणंनकर, किरण कोरगांवकर, अनिल गावकर, अनंत पडेलकर, स्वप्नील धुमाळ, राकेश मिश्रा, विशाल गुप्ता आणि भाजपा महिला मोर्चाची संपूर्ण टीम आदि उपस्थित होते. सदर भव्य दिव्य समारंभाचे सूत्रसंचालन निवेदिका करुणा सचिन गगे यांनी आपल्या मनमोहक आणि भारदस्त आवाजाने कार्यक्रमाला एक वेगळ्याच उंचीवर नेले होते.

नवीन नांदेड : शिवसेनेचे जूने व जानते निष्ठावंत शिवसैनिक म्हणून परिचित असलेले बाभूळगाव येथिल रहिवाशी अशोक मोरे स्वगृह परतले शिवसेना शिंदे गटाचे आ हेमंत पाटील यांच्या हस्ते अशोक मोरे यांचा पक्ष प्रवेश करण्यात आला यावेळी आ. आनंदराव बोंढारकर आ बाबुराव कोळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

थोडक्यात बातम्या...

अशोकराव चव्हाण यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने ५० हजार रूद्राक्ष वाटप

नवीन नांदेड (स. गांवकरी) : लोकनेते माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान खासदार अशोकराव चव्हाण यांच्या वाढदिवसा निमित्त आयोजक तथा ओबीसी महानगर अध्यक्ष विनोद कांचनगिरे यांच्या वतीने महाकाल उज्जैन येथुन आणलेले ५० हजार रूद्रांक्ष शिवलिंगेश्वर मंदिर सिडको येथे घेण्यात आलेल्या एका सोहळ्यात परिसरातील महिला व भाविक भक्तांना वाटप करण्यात आले,व आणलेली रुद्राक्षची माळ महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांना १०८ रुद्राक्षची माळ थेट गळ्यात घालून देण्यात आली ,यावेळी खासदार अजित गोपछेडे ,भाजपा महानगर नांदेड अध्यक्ष अमर राजुरकर, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा मंगाराणी अंबुलगेकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष डॉ संतुकराव हंबर्डे,माजी महानगर अध्यक्ष दिलीप कंदकुर्ते,माजी सभापती ललिता शिंदे, ओबीसी जिल्हा उपाध्यक्ष हुकुम सिंह ठाकूर,ओम शिलेदार,कविता चव्हाण,गजेवार ताई,डेरनासे ताई, संतोषी भाले, रामकिशन इंदोरीकर,धोत्रक ताई, बाबाराव मुकनवार, डॉ.रमेश नांदेडकर,भाजपा ओबीसी जिल्हा महानगर अध्यक्ष विनोद माधवराव कांचनगिरे शहर सरचिटणीस शितल खंडील आणि भाजप ओबीसी उपाध्यक्ष संतोष कांचनगिरे यांची उपस्थिती होती.

उमेदवारांनी इलेक्ट्रॉनिक जाहिरातींचे प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक

- स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक
- जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांचे आवाहन

अहिल्यानगर (स. गांवकरी) : जिल्ह्यातील कोपरगाव, संगमनेर, श्रीरामपूर, जामखेड, शेवगाव, पाथर्डी, राहाता, राहुरी, देवळाली प्रवरा, शिर्डी व श्रीगोंदा नगरपरिषद तसेच नेवासा नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. या निवडणुकीसाठी निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांनी इलेक्ट्रॉनिक जाहिराती प्रसारणापूर्वी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व नियंत्रण समितीकडून इलेक्ट्रॉनिक जाहिरातींचे प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक आहे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व नियंत्रण समितीचे अध्यक्ष डॉ.पंकज आशिया यांनी केले आहे. राज्य निवडणूक आयोगाने जिल्ह्यातील ११ नगरपरिषद व १ नगरपंचायत निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून आजपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. या निवडणुकीसाठी संबंधित अधिनियमांतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेल्या आदेश व सूचनांनुसार उमेदवारांनी कार्य करणे आवश्यक आहे. सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसारित किंवा प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक विषयक प्रस्तावित जाहिरातींचे प्रमाणीकरण समितीकडून पूर्व प्रमाणन करून घेणे आवश्यक आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये दूरदर्शन, उपग्रह वाहिन्या, केबल वाहिन्या, यूट्यूब वाहिन्या, केबल नेटवर्क, आकाशवाणी, खासगी एफ.एम. वाहिन्या, चित्रपटगृहे, बल्क एस.एम.एस., व्हॉइस एस.एम.एस., संकेतस्थळे आदींचा समावेश होतो. समाजमाध्यमे (सोशल मीडिया) यात इंटरनेटद्वारे वापरली जाणारी संवादाची व माहितीची व्यासपीठे समाविष्ट होतात, ज्याद्वारे लोक एकमेकांशी संवाद साधतात, माहिती शेअर करतात, प्रतिक्रिया व्यक्त करतात, मते किंवा विचार मांडतात आणि विविध प्रकारची माहिती (फोटो, व्हिडिओ, लेख, बातम्या) इतरांपर्यंत पोहोचवतात. उदा. एक्स (पूर्वीचे ट्विटर), फेसबुक, लिंक्डइन, व्हिडिओ शेअरिंग प्लॅटफॉर्म्स, मायक्रो ब्लॉगिंग साइट्स, मेसेजिंग ॲप्स (व्हॉटसॲप, टेलिग्राम) तसेच कोलॅबोरेटिव्ह टूल्स (विकी, डिस्कशन फोरम्स) इत्यादींचा समावेश होतो.

वेदांचे भंडार व आत्म ज्ञानाचा ठेवाचे दार ज्ञानेश्वर माऊलींनी उघडले

शिवनेरी (स. गांवकरी) : बागलोहरे गावठाण नारायणगाव ता. जुन्नर येथे श्री संत सद्गुरु गोपाजी बाबा महाराज संजीवन समाधी पायी दिंडी सोहळा कोपरगाव तालुका बहादपूर ते श्री क्षेत्र आळंदी गेली तीस वर्षे स्वर्गीय कै. लक्ष्मण नागुजी नाईक व ग्रामस्थांच्या वतीने रविवार दिनांक ९ सायंकाळी ५ ते पहाटे ५ पर्यंत सर्व वारकऱ्यांची सेवा करण्यात आली आहे. या ठिकाणी सायंकाळी ठीक ५ : ३० हरीपाठ व ६ : ४५ महाआरती तसेच पहाटे ५ वा. काकड आरती घेण्यात आली. याप्रसंगी सर्व महात्मा फुले सोसायटी कार्यकारी संचालक विजय नाईक , संदीप नाईक , माजी आयकर अधिकारी अशोक डोके , महात्मा फुले शाखा अधिकारी बाळासाहेब घोडेकर , माजी पाटबंधारे अधिकारी रंगनाथ नाईक , पत्रकार राजेश डोके उपस्थित होते . ह भ प श्रीराम गाडेकर यांनी रात्री ८ वा . किर्तनरुपी सेवेमधून श्री संत चोखोबा महाराज यांचा " वघडोनी वेदार्थाचा ठेवा । केला तरणोपाय जीवा ॥ १॥ ऐसा समर्थ ज्ञानदेव। तया चरणी ठेवा भाव " ॥ २ ॥ या अभंगामधून सांगितले की , वेदांचे भंडार व आत्मज्ञानाचा ठेवाचे दार ज्ञानेश्वर माऊलींनी उघडले. यामुळे सर्व संतांनी ज्ञानोबारायांना वंदन केले . जगात दुःखी कोणी राहू नये सर्वांनी समाधानी रहा . धर्माप्रमाणे आचरण , प्रत्येक गोष्टीला सहाय्य घेण्याची गरज आहे . गीता , रामायण , महाभारत , सर्व संत व छत्रपती शिवाजी महाराज यांची माहिती या कीर्तनात ह भ प श्रीराम गाडेकर यांनी सांगितली .

मांडवी जिल्हा परिषद गटातून सौ. शामला रमेश बद्दीवार भाजपाच्या प्रबळ उमेदवार

किनवट : (समर्थ गांवकरी)

मांडवी जिल्हा परिषद गट (ओबीसी महिला राखीव) या जागेसाठी भारतीय जनता पक्षाच्या निष्ठावान, समाजाभिमुख व अनुभवी कार्यकर्त्या सौ. शामला रमेश बद्दीवार यांची उमेदवारी देण्यात यावी, अशी मागणी कार्यकर्त्यांमधून आणि स्थानिक जनतेकडून तीव्रपणे होत आहे. सौ. बद्दीवार या मौजे लिंगी (ता. किनवट) येथील रहिवासी असून, त्या सेवा निवृत्त अभियंता व गोल्ला समाजाचे जिल्हाध्यक्ष रमेश लचमन्ना बद्दीवार यांच्या सौभाग्यवती आहेत. सौ. बद्दीवार या गेल्या दोन दशकांपासून किनवट तालुक्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्यरत आहेत. या अणुषंगाने रमेश बद्दीवार व शामला

बद्दीवार यांनी मांडवी जिल्हा परिषद गटातील संपुर्ण गावांना भेटी देऊन संपर्क वाढवला असुन याद्वारे त्यांना नागरीकांचा मोठे समर्थन प्राप्त होत आहेत. तसेच त्यांनी भाजपाच्या विविध योजना, अभियान व पक्षाच्या संकल्पना नागरीकां पर्यंत पोहचवले असुन त्यांनी भाजपाच्या विविध अभियानाचे यशस्वी आयोजन केले आहे. मांडवी गटात आदिवासी व तेलगु, मराठी व इतर भाषिक समाज मोठ्या प्रमाणात आहेत ज्यांचे संबध बद्दीवार यांचे शासकीय नोकरीत असतांना प्रस्तापित झालेले आहे. तर बंजारा समाजाशी देखिल बद्दीवार कुटुंबाचे सलोख्याचे संबध आहेत. हे समिकरण पाहता सौ. बद्दीवार यांची भाजपाच्या उमेदवारीवर दावा अत्यंत प्रबळ ठरतो याची पक्षश्रेष्ठीने देखिल नोंद घेतलेली आहे.

त्यांनी विविध महिला बचत गटांच्या अध्यक्षा म्हणून ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचे कार्य केले आहे. त्याचबरोबर परिसरातील हळदीकुंकू, बतकम्मा उत्सव, शारदा देवी उत्सव यांसारखे सांस्कृतिक उपक्रम महिलांच्या सहभागासह मोठ्या प्रमाणात आयोजित केले जातात.दरवर्षी श्रावण महिन्यात मांडवी ते उनकेश्वर या मार्गावर भव्य कावड यात्रा आयोजित करून धार्मिक आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश दिला जातो. तसेच भागवत कथा, सत्संग, धार्मिक प्रवचन यांसारख्या कार्यक्रमांतून समाजातील सर्व घटकांना जोडण्याचे कार्य त्या करीत आहेत.

सौ. शामला बद्दीवार या दीर्घकाळापासून भारतीय जनता पक्षाशी निगडित असून, भाजपा तालुका उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडलेली आहे. त्यांनी १९९७ साली अपक्ष उमेदवार म्हणून पंचायत समिती मांडवी गणातून निवडणूक लढवली आणि विजयी ठरल्या. परंतु फेरमतमोजणीत त्या एक मताच्या फरकाने पराभव झाला, तर २००२ साली भाजपा तर्फे पंचायत समिती कोठारी (सी) येथे निवडणूक लढवली व दुसऱ्या क्रमांकावर राहिल्या. त्यांचा राजकीय अनुभव, संघटन कौशल्य आणि जनसंपर्क या सर्वांच्या आधारे त्यांना पक्षकार्यकर्त्यांत उत्तम प्रतिष्ठा लाभली आहे.

रमेश बद्दीवार यांच्या शासकीय सेवेतून आणि सामाजिक कार्यातून बद्दीवार कुटुंबाने किनवट-माहूर परिसरातील सर्व समाजघटकांशी स्नेहाचे संबंध प्रस्थापित केले आहेत. बांधकाम साहित्य विक्रीच्या व्यवसायामुळे व्यापारी, शेतकरी, कामगार, महिला आणि युवक या सर्व घटकांमध्ये बद्दीवार कुटुंबाचा विश्वास आणि आदर आहे. सौ. शामला बद्दीवार यांना मराठी, तेलुगू, हिंदी तसेच स्थानिक बोलीभाषांवर प्रभुत्व असून त्या लोकांशी थेट संवाद साधण्यात कुशल आहेत. सौ. बद्दीवार यांच्या दीर्घकालीन सामाजिक कार्याचा, महिला नेतृत्वाचा व भाजपा विचारसरणीवरील निष्ठेचा विचार करता, मांडवी जिल्हा परिषद गट (ओबीसी महिला राखीव) या जागेसाठी त्यांना भाजपातर्फे उमेदवारी मिळावी, अशी मागणी स्थानिक कार्यकर्ते, महिला मोर्चा, तसेच विविध समाजघटकांकडून होत आहे. त्यांच्या उमेदवारीमुळे मांडवी गटात पक्षाचा जनाधार अधिक दृढ होऊन भाजपाच्या विजयाची शक्यता अधिक बळकट होईल, असा विश्वास स्थानिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

बिबट्यापासून संरक्षणासाठी जनजागृतीचा कार्यक्रम संपन्न

नारायणगाव : (समर्थ गांवकरी)

जुन्नर ,आंबेगाव ,खेड ,शिरूर या तालुक्यात बिबट्याने मोठ्या प्रमाणात धुमाकूळ घातला आहे .या तालुक्यातील पिंपरखेड ,जांबूत ,पिंपळवंडी यासारख्या गावाजवळ बिबट्याच्या हल्ल्यात वृद्ध महिलेचा तसेच चिमुकल्या बालकांचा जीव गेला आहे .त्यामुळे सर्वत्र भीतीचे वातावरण असल्याने निमगाव सावा (ता .जुन्नर) येथील पंडित नेहरू विद्यालयात बिबट्यापासून संरक्षणाची जनजागृतीचा कार्यक्रम संपन्न झाला . जुन्नर वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वन परिमंडल अधिकारी गणेश बगाडे यांनी विद्यार्थ्यांना बिबट्यापासून आपली काळजी कशी घ्यावी ,याबद्दल मार्गदर्शन केले .

मुलांनी शाळेत ये –जा करताना एकट्याने न जाता समूहाने गेले पाहिजे .घरासमोरचा परिसर स्वच्छ ठेवावा .शेतात काम करताना आजूबाजूला लक्ष द्यावे अशा सूचना त्यांनी केल्या .शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांनी जास्त काळजी घेण्याचे आवाहन त्यांनी केले .तसेच काही आढळून आल्यास तात्काळ वनविभागाशी संपर्क साधण्याचे सांगण्यात आले .

रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी होणार दप्तर मुक्त

डिजिटल बोर्ड व स्मार्ट टीव्ही सेवा सुरू

जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)

२१व्या शतकातील परिवर्तनाला सामोरे जाण्यासाठी "रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूल, ओतूर", ने शिक्षणाच्या दालनात नव्या युगाचा आरंभ केला आहे येथे, विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल करण्याचे आमचे ध्येय केवळ शब्दात नव्हे,तर कृतीत उतरते आहे आता शाळेतील बहुसंख्य वर्गांमध्ये "इलेक्ट्रॉनिक डिजिटल बोर्ड" व "स्मार्ट टीव्ही" ही शैक्षणिक साधने स्कूल मध्ये उपलब्ध केली आहेत,ही साधने मुलांच्या कल्पनाशक्तीला स्पर्श करणारी,त्यांच्या मनात ज्ञानाचा दीप प्रज्वलित करणारी माध्यमे आहेत.मुलांना जेव्हा दृक-श्राव्य स्वरूपात संकल्पना समजावून सांगितल्या जातात,तेव्हा प्रत्येक अक्षर त्यांच्या हृदयापर्यंत पोहोचते त्यांचे विचार विस्तारतात,स्वप्नांना व्यवहारिक पंख मिळतात शाळेच्या डिजिटल पडद्यावर झळकणा ऱ्या निसर्ग सौंदर्याच्या दृश्यांनी,इतिहासातील प्रेरक जीवनदृश्यांनी,विज्ञानाच्या प्रयोगांनी मुलांचा आत्म विश्वास दुणावतो. आता प्रत्येक शनिवारी आमच्या शाळेत "दप्तरमुक्त शाळा" हा शासनाचा उपक्रम राबविण्यास सुरुवात केली

आहे.या दिवशी मुलांच्या पाठीवरील शैक्षणिक ओझे बाजूला ठेवून,ते रंग,सुर,वैज्ञानिक प्रयोग,नाटक,अभिनय,कला आणि क्रीडा यात रमतील प्रत्येक विद्यार्थी आपल्या सुप्त गुणांमध्ये न्हालेला असेल त्यांना शिकवणे केवळ एक माहिती देणे नसून, त्यांच्या स्वप्नांना आणि व्यक्तिमत्वाला नवसंजीवनी देणे हेच आमचे ध्येय आहे. याशिवाय प्रशिक्षित अध्या पिका विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक शाळेतील जवळपास सर्व अध्यापिका बी.एड. प्रमाणपत्रधारक व अध्यापनात कुशल आहेत त्या विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या आशा,अपेक्षा, स्वप्ने आणि भावना समजून घेऊन त्यांचा परिपोष करतात..!!

ठाणे घोडबंदर रस्ता जानेवारी २०२६ मध्ये वाहतूक कोंडीमुक्त होणार

ठाणे : (समर्थ गांवकरी)

गायमुख घाटाचे पुनर्पुष्ठीकरण, घोडबंदर सेवा रस्ता जोडणी, अमृत जलवाहिनी टाकणे आणि महावितरणच्या वाहिन्यांचे स्थलांतरण ही सर्व कामे पूर्ण होऊन नवीन वर्षात जानेवारी २०२६मध्ये घोडबंदर रस्ता पूर्णपणे वाहतूक कोंडीमुक्त होईल, असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सोमवारी केले. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांबाबत आढावा बैठक सोमवारी आयोजित करण्यात

आली होती. ठाणे महापालिका मुख्यालयातील कै. अरविंद पेंडसे सभागृहात झालेल्या या बैठकीस, महापालिका आयुक्त सौरभ राव, एमएमआरडीएचे सह महानगर आयुक्त आस्तिक कुमार पाण्ड्ये, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, पोलीस उपायुक्त (वाहतुक) पंकज शिरसाट, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा यांच्यासह महापालिका, एमएमआरडीए, मेट्रो, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, म्हाडा आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते. जस्टिस फॉर घोडबंदर रोड यांचे प्रतिनिधीही या बैठकीत सहभागी झाले होते. घोडबंदर रोडवरील विविध समस्यांबाबत जस्टिस फॉर घोडबंदर रोडच्या प्रतिनिधींनी या बैठकीत सादरीकरण केले. त्याचा आढावा घेतल्यानंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एमएमआरडीए, महापालिका, मेट्रो आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून रस्त्यावरील कामांच्या स्थितीची माहिती घेतली.

नगर शहरात बनावट कागदपत्रांद्वारे जमीन व्यवहार

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

नगर तालुक्यातील जमीन खरेदी-विक्रीच्या व्यवहारात बनावट कागदपत्रे, खोटे मालक उभे करून आणि बनावट सह्यांच्या आधारे सावेडी येथील डॉक्टरची तब्बल १४ कोटी ६६ लाख ५१ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात ३० जणांच्या टोळीविरोधात कटकारस्थान रचून फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार डिसेंबर २०१७ ते फेब्रुवारी २०२१ या कालावधीत निंबळक (ता. नगर) गावच्या शिवारात घडला आहे. याबाबत डॉ. अनिल आठरे पाटील (वय- ७३, रा. झोपडी कॅन्टीन समोर, आठरे पाटील हॉस्पीटल, सावेडी) यांनी फिर्याद दिली आहे.

मुख्य संशयित आरोपी भाजपाचा माजी नगरसेवक स्वप्नील शिंदे, अमोल जाधव आणि त्यांच्या इतर साथीदारांनी संगनमत करून हा कट रचला.

कार्तिकी यात्रेसाठी आळंदीत वाहतुकीत मोठे बदल

- १२ ते २० नोव्हेंबरदरम्यान वाहनांना प्रवेश बंदी, पर्यायी मार्ग, पार्किंगची व्यवस्था, बस थांबे माहिती

आळंदी : (समर्थ गांवकरी)

श्री क्षेत्र आळंदी येथे कार्तिकी यात्रे च्या निमित्ताने पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेने वाहतूक नियंत्रण अधिसूचना जारी केली आहे. आळंदी यात्रा १२ ते २० नोव्हेंबर २०२५ कालावधीत होत आहे. यात १५ नोव्हेंबर रोजी कार्तिकी एकादशी आणि १७ नोव्हेंबर रोजी संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांचा संजीवन समाधी दिन सोहळा असल्याने महाराष्ट्रासहदेश विदेशातून

लाखो भाविक देवदर्शनासाठी येत असतात. या भाविकांची गर्दी लक्षात घेऊन तसेच आळंदी आणि देहूगाव येथील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी हे तात्पुरते बदल करण्यात आले आहेत.

पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विवेक पाटील यांनी मोटार वाहन कायद्यातील प्राप्त अधिकारानुसार हे आदेश निर्गमित केले आहेत.

दिनांक १२ नोव्हेंबरपासून ते २० नोव्हेंबरपर्यंत अत्यावश्यक सेवा आणि दिंडीतील वाहने वगळता, सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांसाठी काही मार्गांवर प्रवेश बंद करण्यात आला आहे.

मोशी चौक आणि भारतमाता चौक (मोशी) येथून आळंदीकडे येणारी जड अवजड वाहने : या वाहनांनी जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे चोविसावाडी / विश्रांतवाडी / भोसरी मार्गे इच्छित स्थळी जावे. तसेच भोसरी चौक मॅगझीन चौक मार्गे विश्रांतवाडी. मोशी-चाकण शिक्रापूर मार्गे इच्छित स्थळी जाता येईल.

चिंबळी फाटा चौक (चाकण), आळंदी फाटा चौक (चाकण), माजगाव फाटा, भोसे फाटा, आणि चाकण-वडगाव घेणंद मार्गे आळंदीकडे येणारी वाहने:

या वाहनांसाठी देखील जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे चोविसावाडी /विश्रांतवाडी / भोसरी किंवा भोसरी चौक मॅगझीन चौक मार्गे विश्रांतवाडी हे पर्यायी मार्ग उपलब्ध आहेत. माजगाव आणि भोसे फाट्याकडून येणाऱ्या वाहनांनी कोयाळी कमान, कोयाळी मरकळगाव मार्गे जावे.

मरकळ मार्गे आळंदीकडे येणारी जड अवजड वाहने:

यांनी धानोरी फाटा, चऱ्होली फाटा मार्गे भोसरी-विश्रांतवाडीचा मार्ग अवलंबावा.

पुणे-दिघी मॅगझीन चौक मार्गे आळंदीकडे येणारी वाहने:

यांसाठी भोसरी मार्गे मोशी चाकण, अलंकापुरम जयगणेश साम्राज्य चौक मार्गे-चाकण, किंवा चऱ्होली फाटा धानोरीफाटा मार्गे मरकळ पुणे हे पर्याय आहेत.

याव्यतिरिक्त, देहूगाव कमान (जुना मुंबई-पुणे हायवे) येथून देहूगावकडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद आहे. तसेच कॅनबे चौक येथून देहूगावात जाणाऱ्या सर्व जड अवजड वाहतुकीस प्रवेश बंदी आहे. तळेगाव-चाकण रोडवरील देहूफाटा येथून देहूगाव जाणाऱ्या रस्त्यावरून सर्व प्रकारच्या जड अवजड वाहतुकीस प्रवेश बंद असेल.

या मार्गावरील वाहने एच.पी. चौक मार्गे इच्छित स्थळी जातील. देहू कमान ते चौदा टाळकरी कमान ते भैरवनाथ चौक हा रस्ता सर्व प्रकारचे वाहनांसाठी बंद राहील, त्यांनी परंडवाल चौक, साईराज चौक ते भैरवनाथ चौक मार्गे इच्छितस्थळी जावे.

१२ नोव्हेंबरपासून ते २० नोव्हेंबरपर्यंत (अत्यावश्यक सेवा आणि दिंडीतील वाहने वगळता), खालील ठिकाणांवरून आळंदी शहरात जाणाऱ्या सर्व वाहनांना प्रवेश बंदी रहाणार आहे:

पुणे – आळंदी रस्ता: चऱ्होली फाटा चौक येथे रस्ता बंद असेल.

मोशी – आळंदी रस्ता: डुडूळगाव जकातनाका येथे प्रवेश बंद असेल.

कुबेर गणेश मंदिरात अमोल भांबरकर यांच्या हस्ते महाआरती

प्रत्येकाने आपला जन्मदिन हिंदू संस्कृतीप्रमाणे साजरा करावा : गजेंद्र सोनवणे

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

मातृ पितृ देवो भव,आचार्य देवो भव ही आपली हिंदू संस्कृती आहे.प्रत्येकाने डीजे,फ्लेक्स, फटाके वाजवून वाढदिवस साजरा करण्यापेक्षा हिंदू संस्कृती प्रमाणे मंदिरामध्ये अभिषेक,पूजा पाठ, महाआरती करून जन्मदिन साजरा करावा.विश्व हिंदू परिषदेचे अमोल भांबरकर यांनी कुबेर गणेशाची महाआरती करून जन्मदिन साध्या पद्धतीने धार्मिक कार्य करून साजरा केला आहे.श्री भांबरकर हे देव,देश धर्मासाठी उत्कृष्ट कार्य

करीत आहेत.प्रत्येकाने आपला जन्मदिन हिंदू संस्कृतीप्रमाणे साजरा करावा.असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे गजेंद्र सोनवणे यांनी केले आहे. दिल्लीगेट येथे विश्वहिंदु परिषद व चौपाटी कारंजा मित्र मंडळाचे वतीने चतुर्थी निमित्त श्री कुबेर गणेश मंदिरात महाआरती चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख तथा डिजिटल मीडिया पत्रकार संघटनेचे खजिनदार अमोल भांबरकर व सौ.विजया भांबरकर यांच्या हस्ते महाआरती करुन हिंदू संस्कृतीनुसार जन्म दिन साजरा करण्यात आला.याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे मिलिंद मोभारकर,हरिभाऊ डोळसे, गजेंद्र सोनवणे, वीरेंद्र शिंदे , अजय चितळे,भाजपाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, कार्यालयीन मंत्री मुकुल गंधे,रवी दंडी,निलेश चिपाडे, चौपाटी कारंजा मित्र मंडळाचे अमोल भंडारे,महेश कुलकर्णी, सुरेंद्र सोनवणे,नरेंद्र सोनवणे, सागर रोहोकले,सकल माळी समाजाचे विश्वस्त विनोद पुंड, डॉ.रणजीत सत्रे,उद्योजक संजय गारुडकर,कॅप्टन सुधीर पुंड, अनिल इवळे, पत्रकार अनिल शहा,उदय जोशी,अमोल निस्ताने,चंद्रकांत पुंड,सुधाकर कानडे, समता परिषदेचे महानगर जिल्हाध्यक्ष ब्रिजेश ताठे,कैलास खताळ,भरत थोरात,बाली जोशी,सागर सब्बन,गणेश पलंगे,राजेंद्र चुंबळकर ,सुचित भळगट, सचिन पळशीकर,राहुल वरखेडकर, तेजस वैद्य, अँड.पराग देशमुख, सुचित भळगट,संतोष संबळे, प्रदीप बोज्जा,कृष्णा सांबळे आदी उपस्थित होते.

श्रीगोंदा तालुका : येथील सामाजिक कार्यकर्ते ॲड. सुशीलकुमार गुलाबराव शिंदे यांनी किल्ले बनवूया शिवरायाच्या संस्कार जपूया, यासाठी प्रभाग क्रमांक मधील नगरिकांसाठी किल्ले बनवा महास्पर्धेचे आयोजन केले होते . या स्पर्धेत जिंकणाऱ्या ५ स्पर्धकांना घनश्याम शेलार,एकनाथ आळेकर,सुशीलकुमार शिंदे ,नितीन रोही (पत्रकार),राहुल गांधी यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

थोडक्यात बातम्या...

अरुण क्षिरसागर यांची आळंदी नाभिक धर्मशाळा विश्वस्त म्हणून बिनविरोध निवड

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : जुन्नर तालुका नाभिक संघटनेचे कर्तुत्ववान आणि कर्तव्यनिष्ट असे धडाडीचे अध्यक्ष अरुण क्षीरसागर भाऊसाहेब यांची आळंदी नाभिकधर्मशाळा विश्वस्त पदी रविवार दि:-९ नोव्हेंबर रोजी सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आलीअशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष शंकरराव क्षीरसागर यांनी दिली. अरुण क्षीरसागर यांच्या निवडीचे जुन्नर तालुका नाभिक संघटना,श्री संत सेना पतसंस्था आळेफाटा,भीमाशंकर नाभिक धर्मशाळा,नारायणगाव नाभिक असोसिएशन,जुन्नर शहर संघटना तसेच आळेफाटा नाभिक संघटना,या सर्वांतर्फे हार्दिक अभिनंदन आणि भविष्यातील सामाजिक आणि धार्मिक वाटचालीकरिता खूप खूप शुभेच्छा देण्यात आल्या.

पोलिस मित्र मानधिकारी संघटना दिल्ली यांची आढावा बैठक पार पडली

ठाणे (स. गांवकरी) : पोलिस मित्र मानधिकारी संघटना दिल्ली ठाणे जिल्ह्याच्या वतिने मुरबाड मध्ये आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राजहंस वाढे जिल्हा अध्यक्ष राजेश भांगे यांच्या अध्यक्षतेखाली मुरबाड शिवनेरी शासकीय विश्रामगृहात येथे पोलिस मित्र मानधिकारी संघटना ही जनतेची एक ताकद असून अन्याय अत्याचार यांबाबत संघटना वेळोवेळी मदत करणार पोलिस ठाण्यात कोणत्याही काम असले तरी संघटना आपली मदत करणार कोणत्याही सरकारी कार्यालये येथे काम असेल तर आपली आयडी दाखवून प्रेमाने करून घ्या असे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राजहंस वाढे यांनी सांगितले यावेळी सर्व पदाधिकारी यांना लाईन्स आयडी निवड पत्र वाटप करण्यात आले या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राजहंस वाढे जिल्हा अध्यक्ष राजेश भांगे मुरबाड शहर अध्यक्ष विलास शिंदे मुरबाड तालुका अध्यक्ष नरेश म्हाडसे टोकावडे विभाग अध्यक्ष प्रमोद कोयते अकोला तालुका अध्यक्ष कविता वाकचौरे धुळे राजेश्री सोनावणे नालासोपारा अध्यक्ष जिल्हा अध्यक्ष मालती इंदवे सिने अभिनेत्री प्रिती वर्मा कल्याण तालुका अध्यक्ष राजेश्री चौधरी शहापूर अध्यक्ष राजेंद्र चौधरी मुरबाड तालुका उपाध्यक्ष अनिल देसले निखिला पालकांडी कल्याण शहर उपाध्यक्ष धनश्री देशमुख नेरूळ शहर अध्यक्ष इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

ठाणे महापालिका निवडणुकीसाठी आज आरक्षण सोडत

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महानगरपालिकेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण महिला यांच्यासाठी आरक्षण निश्चित करण्याकरीता सोडत काढणे, तसेच आरक्षणाचे प्रारूप प्रसिध्द करण्यासाठीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. ठाणे महापालिकेच्या राम गणेश गडकरी रंगायतन, मूस रोड, तलावपाळी, ठाणे (प.) या नाट्यगृहात मंगळवार, दि. ११ नोव्हेंबर, २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजल्यापासून आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. ठाणे महानगरपालिकेत एकूण ३३ प्रभाग आहेत. त्यापैकी, ३२ प्रभाग हे चार सदस्यीय असून ०१ प्रभाग तीन सदस्यीय आहे. या ३३ प्रभागातून एकूण १३१ सदस्य निवडले जाणार आहेत. या १३१ पैकी, अनुसूचित जातींसाठी ०९ जागा, अनुसूचित जमातींसाठी ०३ जागा, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी ३५ जागा आणि सर्वसाधारण प्रवर्गासाठी ८४ जागा आहेत. एकूण १३१ जागांपैकी महिलांसाठी ६६ जागा आरक्षित आहेत. त्यापैकी, अनुसूचित जातींच्या ०५ जागा, अनुसूचित जमातींच्या ०२ जागा, नागरिकांचा मागास प्रवर्गातील १८ जागा आणि सर्वसाधारण प्रर्वगातील ४१ जागा महिलांसाठी राखीव आहेत. नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग आणि महिलांसाठी राखीव करावयाच्या सर्व प्रवर्गांतील जागांसाठी सोडतीच्या चिठ्ठ्या शालेय विद्यार्थ्यांकडून काढण्यात येतील. त्यात प्रथम अनुसूचित जातीच्या महिलांसाठी ०५ जागांची सोडत काढण्यात येईल. नंतर, अनुसूचित जमातीच्या ०२ प्रभागांच्या जागांसाठी सोडत काढली जाईल. त्यानंतर, नागरिकांच्या मागास प्रर्वगाच्या प्रभागांसाठी ३५ जागा आरक्षित करायच्या असून त्यासाठी सोडत निघेल. त्यानंतर, नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांच्या १८ जागांसाठी आरक्षण सोडत होईल. पाठोपाठ सर्वसाधारण (खुल्या) प्रवर्गातील महिलांसाठी राखीव करावयच्या ४१ जागांसाठी आरक्षण सोडत होईल.सोमवार, दि. १७ नोव्हेंबर, २०२५ रोजी आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्यात येणार आहे. तर, सोमवार, दि. १७ नोव्हेंबर, २०२५ ते सोमवार, दि. २४ नोव्हेंबर, २०२५ (दुपारी ३.००वाजेपर्यंत) आरक्षणाबाबत हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी आहे.

भारतीय जनता पार्टी सातपूर मंडळ – प्रभाग क्र. ९ अंतर्गत शक्ती केंद्र प्रमुखांची बैठक उत्साहात

नाशिक : (समर्थ गांवकरी)

भारतीय जनता पार्टी सातपूर मंडळाच्या प्रभाग क्र.९ अंतर्गत शक्ती केंद्र प्रमुखांची बैठक सौ.सविता करण गायकर यांच्या 'तुळजाई' निवासस्थानी मोठ्या उत्साहात व संघटनात्मक वातावरणात संपन्न झाली.

या बैठकीचे आयोजन नाशिक पश्चिम मतदारसंघाच्या कार्यसम्राज्ञी आमदार मा. सीमाताई महेश हिरे,नाशिक शहर जिल्हा अध्यक्ष श्री.सुनील केदार साहेब आणि मंडल अध्यक्ष श्री.नारायण (बापू) जाधव सर सरचिटणीस रश्मीताई हिरे - बेंडाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

बैठकीचा प्रारंभ सौ.सविता करण गायकर यांच्या प्रास्ताविकाने झाला.त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले –

भारतीय जनता पक्ष हा राष्ट्रहित व विकास या दोन्हींचा संगम असलेला पक्ष आहे.प्रत्येक कार्यकर्ता हा पक्षाचा आधारस्तंभ असून,शासनाच्या विविध योजना लाडकी बहीण योजना शेतकरी व महिला कल्याण योजना प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचवणे ही आपली जबाबदारी आहे. संघटनाची मुळे बुथपर्यंत घट्ट रुजवूनच आपण भारतीय जनता पक्षाचा विजय सुनिश्चित करू शकतो.कार्यकर्त्यांनी आत्मीयतेने, जबाबदारीने आणि सेवाभावाने काम करावे,हेच पक्षाच्या बळकटीचे खरे द्योतक आहे.

मीटिंग चे मंडल अध्यक्ष श्री. नारायण (बापू) जाधव यांनी संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेताना सांगितले मतदार यादीतील सुधारणा,हरकती व पत्ते दुरुस्ती यावर लक्ष ठेवणे अत्यावश्यक आहे.प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या क्षेत्रातील नागरिकांना शासनाच्या योजनांची माहिती द्यावी आणि त्यांचा लाभ मिळवून द्यावा.हीच खरी जनसेवा आहे.

त्यानंतर सौ.रश्मीताई हिरे-बेंडाळे (सरचिटणीस,भाजपा नाशिक शहर) यांनी मार्गदर्शन करताना कार्यकर्त्यांमध्ये उर्जा संचार केली.त्यांनी म्हटले भारतीय जनता पक्षाचा प्रत्येक बूथ हा पक्षाचा कणा आहे.बूथ प्रमुख म्हणजे जनतेशी थेट संवाद साधणारा दुवा.मतदारांशी संपर्क वाढवून,विकासाचा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचवणे हेच आपले ध्येय असले पाहिजे." प्रभाग प्रभारी श्री.शिवाजी (आप्पा) शहाणे मार्गदर्शन करताना सांगितले की

पक्षाने दिलेल्या जबाबदाऱ्या या केवळ पद नसून ती जनसेवेची संधी आहे.प्रामाणिकपणा संघभावना आणि निष्ठा या तिन्ही गोष्टी प्रत्येक कार्यकर्त्याने जपल्या पाहिजेत. संघटन मजबूत राहिले तर विजय आपोआप निश्चित होतो.

बैठकीत बूथस्तरावरील संघटन बळकटी,प्रभागातील स्थानिक प्रश्न,तसेच आगामी नाशिक महानगरपालिका निवडणुकीच्या तयारीसंबंधी सविस्तर चर्चा झाली.

सर्व उपस्थितांनी संघटन बळकटीचा संकल्प व्यक्त केला व पुढील आढावा बैठक लवकरच घेण्यात येईल,असा निर्णय घेण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालनप्रेम दशरथ पाटील यांनी केले तर आभारप्रदर्शन सामाजिक कार्यकर्ते श्री.बजरंग शिंदे यांनी मानले.

या बैठकीला प्रमुख उपस्थिती मध्ये सौ.रश्मीताई हिरे-बेंडाळे – सरचिटणीस,भाजपा नाशिक शहर

श्री.शिवाजी (आप्पा) शहाणे – प्रभारी,प्रभाग क्र.९सौ. हेमलता दिनकर कांडेकर,मा. नगरसेविका सौ.ज्योती बजरंग शिंदे,मा.नगरसेविका

सौ.सविता गायकर,श्री.दिनकर कांडेकर,श्री.हेमंत नागरे,श्री. बजरंग शिंदे,श्री.प्रेम (दादा) पाटील,श्री.गुलाब माळी,श्री. सागर वैष्णव,श्री.बाळा जारे,सौ. भारती माळी,सौ.सिताताई वैष्णव,सौ.अर्चनाताई तूपलोंढे, श्री.अविनाश गायकर,श्री.गोविंद (आबा) माळी,श्री.सुनिल म्हेत्रे,श्री. प्रकाश साळवे,श्री.हर्षल माळी आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रीकृष्ण मच्छिंद्र पवार यांना अखेरची मानवंदना

श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील चांडगाव गावातील सुपुत्र श्रीकृष्ण मच्छिंद्र पवार हे भारत-तिबेट सीमा पोलीस दलात (ITBP) कार्यरत होते. देशसेवेत असताना घरी सुट्टीसाठी येत असताना झालेल्या दुर्दैवी घटनेत त्यांचे निधन झाले. राष्ट्रसेवेतील कर्तव्य बजावत असताना या वीर पुत्राने दिलेलं बलिदान संपूर्ण जिल्ह्याच्या हृदयाला स्पर्शन गेलं आहे.

श्रीकृष्ण पवार यांच्या पश्चात आई-वडील, मोठा भाऊ, पत्नी आणि एक लहान मुलगा असा परिवार आहे. त्यांच्या अकस्मात जाण्याने केवळ चांडगावच नव्हे, तर संपूर्ण श्रीगोंदा तालुक्यात हळहळ आणि शोककळा पसरली आहे. गावकऱ्यांनी सांगितले की, श्रीकृष्ण नेहमी हसतमुख, शांत आणि सेवाभावी होते. त्यांचा देशसेवेचा उत्साह पाहून सगळ्यांना अभिमान वाटत असे. त्यांच्या जाण्याने गावाचा अभिमान हरपलाआहे. श्रीकृष्ण पवार यांनी आपल्या सेवेदरम्यान सदैव देशहिताचं भान ठेवून काम

केले. कर्तव्यनिष्ठा, शिस्त आणि देशभक्ती या गुणांमुळे ते सहकाऱ्यांमध्येही आदराचे स्थान मिळवून होते.

सायकल वितरण व स्वच्छतागृह हस्तांतरण कार्यक्रम संपन्न

जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)

ग्रामविकास मंडळ ओतूर संचलित पुष्पावती विद्यालय डिंगोरे येथे सायकल बँकेच्या माध्यमातून सायकल वितरण व स्वच्छतागृह हस्तांतरण कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. विद्यालयातील माजी विद्यार्थी संघ 'स्वामी विवेकानंद विचार मंच' यांच्या माध्यमातून गरीब व गरजू वीस विद्यार्थिनींना सायकल बँक स्थापन करून सायकलचे वितरण करण्यात आले तसेच विद्यालयाच्या गरजा लक्षात घेऊन विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी सात स्वच्छतागृह युनिटचेविद्यालयाला हस्तांतरण करण्यात आले. कार्यक्रमात विचारमंचाचे संघटक

संतोष पाडेकर यांनी संस्थेच्या ध्येयधोरणांची माहिती सर्वां समोर मांडली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रपती पारितोषिक विजेते,निवृत्त कस्टम अधिकारी आणि मुक्ता देवी मंडळाचे अध्यक्ष सुनील आमले होते.

त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की,"सायकल ही केवळ प्रवासाचे साधन नसून शिक्षणाच्या दिशेने टाकलेले प्रेरणादायी पाऊल आहे. सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.या कार्यक्रमास ग्राम विकास मंडळाचे उपाध्यक्ष प्रभाकर तांबे,खजिनदार रघुनाथ तांबे,सचिव प्रदीप गाढवे,सहसचिव पंकज घोलप,माजी जि.प.सदस्य बबनराव तांबे,उपसरपंच निलेश लोहोटे,तसेच अहिलूनाना लोहोटे,वसंत लोहोटे, लक्ष्मण लोहोटे,पांडुरंग लोहोटे,रवींद्र खरात,बाळकृष्ण खरात,जालिंदर उकिरडे,संदीप शिंगोटे,राहूल शेरकर, तंटा मुक्ती अध्यक्ष राजेंद्र सुकाळे पोलीस पाटील राजेंद्र लोहोटे,दिपक उकीरडे,ग्रामपंचायत सदस्य सूर्यकांत जाधव,अमित बनकर,निलेश आमले,यांची प्रमुख उपस्थिती होती.

"समाजाप्रती आपली जबाबदारी ओळखून माजी विद्यार्थी विचार मंच स्तुत्य कार्य करत आहे."जिल्हा परिषद माजी सदस्य अंकुश आमले यांनी आपल्या मनोगतात सांगितले की,"स्वामी विवेकानंद विचार मंचाचे कार्य हे समाजातील परिवर्त नाचे आणि नवचैतन्याचे प्रतीक आहे."

डिंगोरे ग्रामपंचायतीच्या सरपंच सीमा सोनवणे यांनी विद्यालयाच्या नवीन इमारतीसाठी

ओतूर गावातील अवैध दारू विक्रीला कुणाचा आशीर्वाद?

नाशिक : (समर्थ गांवकरी)

नाशिकच्या कळवण तालुक्यातील गावोगावी किराणा दुकाने, हॉटेल आणि छोट्या स्टॉलवर देशी-विदेशी दारूचा धंदा खुलेआम सुरू आहे. निवडणुका जवळ आल्यामुळे प्रशासनाने अनेक ठिकाणी धडक छापेमारी मोहीम राबवल्याचा देखावा आहे, मात्र ओतूर गावात मात्र या कारवाईचे सावटही नाही! प्रश्न उपस्थित होतो — दारू विक्रेत्यांवर कायदेशीर कारवाई थांबवणारा "अदृश्य हात" नक्की कोणाचा आहे? गावकऱ्यांमध्ये जोरदार चर्चा

रंगली आहे की, "ओतूर येथील दारू विक्रेते संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांचे 'जावईबापू' असल्यामुळेच त्यांच्यावर कुठलीही कारवाई होत नाही का?" हा सवाल आता गावागावात वाऱ्यासारखा पसरला आहे. कारण दिवसा ढवळ्या ओतूरच्या मुख्य रस्त्यावरच देशी-विदेशी दारूची विक्री चालते. शाळेजवळ, बाजारपेठेत, सार्वजनिक ठिकाणी मद्य विक्रीचा उघड उघड व्यवसाय सुरू आहे, आणि तरीही कुणालाही दिसतं नाही का,उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी मात्र 'हप्ते घेण्यात' व्यस्त असल्याची कुजबुज नागरिकांमध्ये सुरू आहे.

दररोज या अवैध धंद्यामुळे गावातील तरुण पिढी दारूच्या आहारी जात आहे. अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. महिलांना अत्याचार सहन करावे लागत आहेत.

दिव्यांग क्षेत्रात विना नोंदणी कार्य करणाऱ्या संस्थांवर कारवाई होणार

ठाणे : (समर्थ गांवकरी)

ठाणे जिल्ह्यासह मुंबई विभागातील विविध जिल्ह्यांमध्ये दिव्यांग क्षेत्रात कार्यरत अनेक संस्था शासनाकडे नोंदणी न करता कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर दिव्यांग कल्याण विभागाने अशा संस्थांवर कायद्यानुसार कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. ठाणे जिल्ह्यांमध्ये कार्यरत दिव्यांग संस्थांनी दि. ३० नोव्हेंबर, २०२५ पर्यंत नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य असून सर्व दिव्यांग संस्थांनी नोंदणी पुर्ण करून घ्यावे, असे आवाहन समाजकल्याण विभाग प्रमुख उज्वला सपकाळे यांनी केले आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार (Rights of Persons with Disabilities Act, 2016) कलम ५१ आणि ५२ अंतर्गत, दिव्यांग क्षेत्रात कार्य करावयाच्या सर्व संस्थांनी शासनाकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे.

महापालिकेच्या जागा बीओटी तत्वावर देण्यास आ. फरांदे यांचा विरोध

शहराचा विकास झपाट्याने होत आहे. असे असताना शहरातील सरकारी जागांचे आरक्षण कमी होत आहे. त्यामुळे लोकोपयोगी प्रकल्प राबविताना जागेच्या उपलब्धतेबाबत नेहमीच अडचण निर्माण होते. तरीदेखील महापालिकेने सरकारी भूखंड बीओटी तत्वावर विकसित करण्याचा घाट घातला आहे. याला माझा विरोध असून, याबाबत मी मुख्यमंत्र्यांनाही पत्र दिले असून, या प्रस्तावाला स्थगिती देण्याची मागणी केली आहे.

- प्रा. देवयानी सुहास फरांदे, आमदार, नाशिक मध्य

नाशिक : (समर्थ गांवकरी)

नाशिक महानगरपालिकेच्या मालकीच्या मोक्याच्या जागा बीओटी तत्वावर खासगी व्यक्तींना देण्याच्या प्रस्तावाला आमदार प्रा. देवयानी फरांदे यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. शहरातील सार्वजनिक जागा खासगीकरणाच्या विळख्यात जाण्याची शक्यता असल्याने हा निर्णय जनहिताविरोधी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. यासंदर्भात आमदार फरांदे यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देत बीओटी प्रक्रियेला तत्काळ स्थगिती देण्याची मागणी केली आहे.

नाशिक शहराच्या विकास आराखड्यात (डी.पी.) २०१७ साली नागरिकांच्या सोयीसुविधांसाठी राखून ठेवलेल्या जागांची संख्या अत्यंत कमी करण्यात आली आहे. त्यामुळे लोकोपयोगी प्रकल्प उभारण्यासाठी शहरात जागेची कमतरता भासत आहे. असे असताना नाशिक महापालिकेने मधूर स्वीट समोरील मॅग्रम हॉस्पिटलजवळील गट क्रमांक १७५ तसेच द्वारका चौफुली येथील सिटी सर्व्हे क्रमांक ४८९ ही महापालिकेच्या मालकीची जागा बीओटी तत्वावर खासगी व्यक्तींना देण्याचा ठराव मंजूर केला आहे. तसेच १९ जानेवारी २०२१ रोजी ठराव क्रमांक ५३० आणि १२ ऑक्टोबर २०२१ रोजी ठराव क्रमांक ११८७ अन्वये सुमारे २६ मिळकती बीओटी तत्वावर विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा प्रस्ताव मंजूर करताना पालिकेचे उत्पन्नवाढीचे कारण देत, महापालिकेने सल्लागाराची नेमणूक करून कराराच्या मुदतीचा कालावधी ३० वर्षांवरून ९९ वर्षे करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी पाठविला आहे. परंतु सदर प्रस्तावाला स्थगिती देण्याची मागणी आमदार फरांदे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली असून, त्यांच्या पत्राची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी पालिकेला प्रस्ताव तपासून निर्णय घेण्याबाबत सूचित केले आहे.

दोन निकालाने विद्यार्थिनीसह पालक चिंताग्रस्त

भिवंडी: (समर्थ गांवकरी)

वैद्यकीय शिक्षा घेण्याचे स्वप्न देशभरातील लाखो विद्यार्थी बघत असतात.त्यासाठी शैक्षणिक अभ्यासासोबत नीट परीक्षेसाठी अनेक विद्यार्थी दिवसरात्र अभ्यासात गढून जातात.त्यातून उत्तम मार्क्स मिळवून वैद्यकीय शिक्षणाची संधी मिळावी ही विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांची दुर्दैम्य इच्छा.परंतु या नीट परीक्षेतील गोंधळातून भिवंडीतील एका विद्यार्थिनीसह तिच्या पालकांना धक्का बसला असून त्यातून नैराश्यग्रस्त होण्याची

वेळ कुटुंबीयांवर आली आहे.

भिवंडीच्या नजीकच्या शेलार ग्रामपंचायत येथे एका यंत्रमाग कंपनीमध्ये काम करून आपल्या मुलांना उच्च शिक्षण मिळवून देण्याची इच्छा मनी बाळगलेले कृष्णा पिनाटे यांची श्वेता ही मुलगी. श्वेता ही वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात आपलं करिअर करण्याचा निश्चय बाळगलेली एक मुलगी.मागील वर्षी नीट परीक्षा दिली परंतु मार्क्स कमी असल्याने पुन्हा एकदा श्वेता हिने जोरदार अभ्यास करून २०२५ ची नीट परीक्षा दिली.या परीक्षेचा निकाल १४ जून रोजी ऑनलाइन जाहीर झाला या निकाल पत्रात श्वेता हिला 492 मार्क्स होते तर 76319 ही ऑल इंडिया रँक होती. तिने निकालाची ऑनलाईन प्रत काढून वैद्यकीय शिक्षणासाठी अर्ज भरण्यास सुरवात केली.रजिस्ट्रेशन केले व त्यानंतर आलेल्या सिलेक्शन यादीत श्वेता हिच्या नावापुढे 275 गुण व ऑल इंडिया रँकिंग 518180 अशी दाखवण्यात आली.हे पाहताच श्वेता व तिच्या पालकांच्या पायाखालची जमीन हादरली.या नंतर श्वेता हिने सी ई टी सेल येथे चौकशी केली तर ही परीक्षा राष्ट्रीय स्तरावर घेतली जाते त्यांच्याकडे चौकशी व तक्रार करा असा सल्ला दिला.त्यानंतर श्वेता हिने 1 नोव्हेंबर रोजी एम सी सी व एन टी ए या संबंधित विभागा सह केंद्रीय आरोग्य शिक्षण मंत्रालयाकडे मेल द्वारा तक्रार केली.पण अजून कोणीही तिच्या तक्रारीचे निवारण केले नाही.

नवीन नांदेड : शिवसेनेचे जूने व जानते निष्ठावंत शिवसैनिक म्हणून परिचित असलेले बाभूळगाव येथिल रहिवाशी अशोक मोरे स्वगृह परतले शिवसेना शिंदे गटाचे आ हेमंत पाटील यांच्या हस्ते अशोक मोरे यांचा पक्ष प्रवेश करण्यात आला यावेळी आ. आनंदराव बोंढारकर आ बाबुराव कोळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

थोडक्यात बातम्या...

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या महानगराध्यक्षपदी रमेश देवडे यांची निवड

नांदेड (स. गांवकरी) : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या नांदेड महानगराध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार रमेश देवडे यांची निवड करण्यात आली आहे. तर कार्याध्यक्षपदी देविदास डांगे, सचिवपदी संतोष कुलकर्णी, उपाध्यक्षपदी संदेश देवके, संघटक दत्तात्रय शेंबाळे, कोषाध्यक्ष विष्णू वाघमारे तसेच सदस्य सुनील बेंद्रीकर यांची निवड करण्यात आली आहे. या नूतन कार्यकारिणीच्या निवडीची पत्रे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे मराठवाडा अध्यक्ष रुपेश पाडमुख आणि जिल्हाध्यक्ष श्रीधर नागापूरकर यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ ही नोंदणीकृत व कार्यक्षम संघटना असून तिची स्थापना संजय भोकरे यांनी केली आहे. राज्य स्तरावर संघटनेचे नेतृत्व मनीष केत हे अध्यक्ष आणि सौ. सुजाता खानोरे राज्य सरचिटणीस या दोघांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड महानगरातील नवी कार्यकारिणी गठीत करण्यात आली आहे. रमेश देवडे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, "पत्रकारांच्या न्याय हक्कांसाठी, त्यांना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी आणि पत्रकारितेतील मूल्यांची जपणूक करण्यासाठी संघ सतत प्रयत्नशील राहील." त्यांनी पुढे सांगितले की, आगामी काळात नवीन सभासद नोंदणी, कार्यकारिणीचा विस्तार आणि पत्रकार हिताच्या उपक्रमांना प्राधान्य दिले जाईल. याप्रसंगी रुपेश पाडमुख, श्रीधर नागापूरकर आणि रमेश पांडे यांनी नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. पत्रकार संघाच्या नव्या कार्यकारिणीमुळे नांदेडमधील पत्रकारांच्या संघटित आणि सकारात्मक नेतृत्वाला नवी दिशा मिळणार आहे.

कवळे गुरुजींच्या कर्तृत्वापुढे; आमदार दाम्पत्याच्या हवालदिल

नायगाव (स. गांवकरी) : विधानसभा निवडणूक काळात उद्योजक मारोतराव कवळे गुरुजींच्या गावात मावंदे जेवणास जावून त्यांच्या उद्योगाचे वभोडे काढणाऱ्या पूनम पवार व आ. राजेश पवार यांनी एम . व्ही. के. अँग्रो कुसुमनगर - वाघलवाडा साखर कारखान्याच्या साखर पूजन सोहळ्यास उपस्थिती लावून गुरुजींच्या उद्योगास भरभराटीच्या शुभेच्छा देत त्यांच्या उद्योग भरभराटीचे कौतुक केले. यामुळे पवार दाम्पत्याच्या या करामतीची चर्चा राजकीय वर्तुळात चागलीच चर्चेत आली आहे. इंग्रजी मध्ये म्हण आहे. ' All is fair love and politics' याची प्रचीती राजकारणात नवी नसली तरी एखाद्याचा पोटतिडकीने राजकीय द्वेष करून त्याच्या जीवन कृतृत्वाच्या मर्मावर बोट ठेवत गावभर आरडाओरडा व धिंडोरा पिटणाऱ्या पूनम पवार यांना गुरुजींच्या कारखान्यातील साखर अचानक एवढी गोड कशी काय लागू लागली याचे कोडे सामन्याच्या चर्चेचा विषय ठरत आहे. यामुळं राजकारणात असणारी माणसं व्यासपीठावर कधी कोणाला कुठल्या पातळीवर कोणत्या विषयावर काय बोलतील याचा नेम नाही. यामुळे त्यांचे असे बोलणे सामान्य नागरिकांनी कितपत मनावर घ्यावीत असा प्रश्न सर्व सामन्याना न उलगडणारच असो वैयक्तिगत कार्य कृतृत्व असेल तर आपणास भले बुरे म्हणणारी, उच्च पातळीवर टिका टिप्पणी करणारी व्यक्ती कितीही मोठी व कुठल्या ही पदावर असू द्या त्या व्यक्तीस ही आपल्या कार्यापुढे कसे झुकावे लागते याची प्रचीती मात्र कवळे गुरुजी यांनी आपल्या औद्योगिक नित्य कर्मातून दाखवून दिले हे मात्र नक्की आहे.

बरबडा सर्कल अंतर्गत अवैध वाळू ची खुले आम वाहतूक जोमात?

नायगाव (स. गांवकरी) : तालुक्यातील बरबडा सर्कल अंतर्गत असलेल्या गावांतील मागील काही दिवसांपासून रात्रीच्या वेळी अवैध रित्या वाळू , उमरी तालुक्यातील व ईळेगाव व येळी येथून बरबडा हद्दीत चोरी व अवैध तस्करी जोमात तर महसुल प्रशासन कोमात ? असल्याचे दिसून येते आहे. या माफियां महसूल प्रशासनाचा ना पोलीस प्रशासनाचा कोणाचाच धाक राहिला , नाही कुणाची भिंती नाही या विभागाच्या वाळू माफियानी रात्रीच्या वेळी वाळूची चोरी करून खुलेआम वाहतूक करत आहेत. बरबडा हद्दीतील ईळेगाव येथील व लोहा तालुक्यातील वाळू रात्रीला मोठ्या प्रमाणात नायगाव तालुक्यातील बरबडा सर्कल अंतर्गत असलेल्या गावात नायगाव तहसिल च्या अनागोंदी कारभारामुळे वाळू व अवैध वाहतूक होत आहे. ती वाळू टिप्परमधून वाहतूक करुन विक्री केली जात आहे.गोदावरी पात्रातून दिवसाढवळ्या वाळू काढल्या जात आहे. चोरीने काढलेली वाळू नायगावच्या तहसीलदार यांनी चोरट्या मार्गाने वाळूचे उत्खनन करून अवैध वाहतूक करणाऱ्यांना रान मोकळे सोडले आहे. काय ? आशी चर्चा बरबडा परिसरात सुरू आहे तहसीलदार डॉ . धमप्रिया गायकवाड यांनी याकडे लक्ष देऊन तत्काळ कारवाई करण्याची मागणी बरबडा व परिसरात गावकऱ्यांनी केली आहे.

"कुकडी कालव्याच्या कामांना जलद गती : ८२ कोटींचा निधी उपलब्ध

■ जिल्हा दुष्काळमुक्त करण्याचे विखे पाटील यांचे निर्धारपूर्ण वक्तव्य!"

पारनेर : (समर्थ गांवकरी)

जिल्हा दुष्काळमुक्त करण्याच्या फक्त वल्गना जाणाऱ्या राजानी केल्या.कुकडी कालव्याच्या कामांना निधी उपलब्ध करून द्यावासा वाटला नाही.जिल्ह्यात फक्त राजकारणासाठी आले निधीसाठी मात्र मागे हटले, आशी घणाघाती टिका जलसंपदा मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली.तालुक्यातील ४९ गावांसाठीच्या सहा उपसा सिंचन योजनांच्या सर्वेक्षणासाठी १कोटी ८५लाख रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला असल्याची माहिती त्यांनी दिली. कृष्णा खोरे

विकास महामंडळाच्या अतंर्गत कुकडी कालव्याच्या कामांचा शुभारंभ मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आला.महायुती सरकारने एकूण ४००कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून,पहील्या टप्प्यातील १ते ६०किलो मीटरच्या कामासाठी ८२ कोटी रुपयांच्या निधी उपलब्ध करण्यात आला आहे.वर्षभरात ही सर्व काम पूर्ण करण्याची ग्वाही त्यांनी दिली.आ.काशिनाथ दाते आ.शरद सोनवणे जेष्ठ नेते बबनराव पाचपुते डॉ.सुजय विखे पाटील मुख्य अभियंता संजीलनव चोपडे अधिक्षक अभियंता अलका अहीरराव राहूल शिंदे विश्वनाथ कोरडे विजयराव औटी सचिन वराळ आदी याप्रसंगी उपस्थित होते.

आपल्या भाषणात मंत्री विखे म्हणाले की,१९८२ सालापासून या कालव्यांना निधी मिळाला नाही. अनेकांनी इथे येवून फक्त भाषण केली.कालव्याच्या कामाला निधी उपलब्ध न झाल्याने चाळीस टक्के पाण्याची गळती होत आहे.१८००क्युसेसने वाहाणारा कालवा आज १४००क्युसेसवर आला.शेवटच्या गावाला पाणी मिळायचे असेलतर कालव्यांची काम केल्याशिवाय पर्याय नव्हता. जलसंपदा विभागाची जबाबदारी मिळाल्यानंतर या कामाला आपण प्राधान्य दिले असून वर्षानुवर्ष पाण्यासाठी संघर्ष कराव्या लागणार्या गावांना काम करून न्याय द्यायचा आणि खासदार साहेबांचे स्वप्न पूर्ण करणे ही भूमिका महायुती सरकारची आहे.

अनेक वर्ष पाण्यापासून या भागाला वंचित ठेवले.पाणी असेल तर विकास आहे.रेडबुल वाटून विकास होणार नसल्याचा टोला लगावून तालुक्याची कामधेनू असलेला कारखाना विकण्याची वेळ कोणी आणली.कामगार देशोधडीला कोणी लावले. मुंबईत बसून कारखाने चालतात का असा सवाल उपस्थित केला. प्रयत्न करून कारखान्याची विक्री थांबवली.तालुक्याला पुर्नवैभव प्राप्त करून देण्यासाठी कारखाना शेतकऱ्यांच्या मालकीचाच राहीला पाहीजे आशी ठाम भूमिका मंत्री विखे पाटील यांनी मांडली.

तालुक्यातील ४९गावांकरीता सहा उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्याच्या प्रस्तावाला मंजूरी दिली असल्याची माहीती देवून योजनांच्या सर्वेक्षणासाठी १कोटी ८५ लाख रुपयांचा निधी दिल्याचे विखे पाटील म्हणाले. आ.काशिनाथ दाते यांनी आपल्या भाषणात वर्षानुवर्ष दुर्लक्षित झालेल्या कामांना मंत्री विखे पाटील यांच्या माध्यमातून गती मिळाली.ही सर्व काम निर्धारीत वेळेत पूर्ण झाली तर दुष्काळी भागाला मोठा दिलासा मिळणार असल्याचे आहे.आ.शरद सोनवणे यांनी कालव्यांच्या कामाची सुरूवात म्हणजे दुष्काळी भागात जलक्रांती आहे. आम्ही पाणी मिळू देत नाही या आरोपातून मुक्तता झाल्याची प्रतिक्रीया आपल्या भाषणात करून जलसंपदा विभागाच्या माध्यमातून मोठे सहकार्य विखे पाटील यांच्या माध्यमातून मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

निवडणुकांची आजपासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

जिल्ह्यातील १२ पालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांचा बिगुल वाजला आहे. आज सोमवारी (दि. १०) उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. उमेदवारांना सकाळी अकरा ते दुपारी तीन या वेळेत अर्ज दाखल करता येणार आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपालिका प्रशासनाने तयारीवर भर दिला आहे. दरम्यान, पालिका निवडणुकीसाठी राज्य अथवा जिल्हा पातळीवरून महायुती अथवा महाविकास आघाडीबाबत कोणतीच घोषणा नसल्याने सर्व पक्षाकडून जवळपास स्व-बळावर निवडणुकांची तयारी सुरू करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले. राज्य निवडणूक आयोगाने मंगळवारी (दि. ४) राज्यातील २४६ नगरपालिका व ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांचा कार्यक्रम घोषित केला. त्यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर, कोपरगाव, श्रीरामपूर, राहाता, शिर्डी, देवळाली प्रवरा, राहुरी, शेवगाव, पाथर्डी, श्रीगोंदा, जामखेड या नगरपलिका व एक नेवासा नगरपंचायतचा समावेश आहे. आयोगाने घोषित केलेल्या कार्यक्रमामध्ये नामनिर्देशन अर्ज हे १० ते १७ नोव्हेंबर या कालावधीत भरण्याची मुदत दिली आहे.

मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांची गाडी फोडेल त्याला एक लाख रुपयांच बक्षीस

अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)

भाजपाचे नेते राज्याचे कॅबिनेट मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफी संदर्भात एक वादग्रस्त वक्तव्य केलं होतं, या वक्तव्यानंतर प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू आक्रमक झाले आहेत.

'जो राधाकृष्ण विखे पाटील यांची गाडी फोडेल, त्याला एक लाख रुपयाचे माझ्याकडून बक्षीस दिले जाईल' अशी थेट घोषणा बच्चू कडू यांनी केलीय.

तर मला जर विखे पाटलांची गाडी दिसली तर मी त्यांची गाडी फोडणार, असा इशारा देखील बच्चू कडू यांनी दिलाय. नाव राधाकृष्ण, कृत्य मात्र कंसाचं करायची असेल तर कंसाची ही अवलाद

मुख्यमंत्र्यांनी हाकलून लावली पाहिजे, अशी मागणी सुद्धा त्यांनी केली. फडवणीस साहेब ऐकीकडे कर्जमाफीची घोषणा करतात.

तर दुसरीकडे हे वाचाळविळ मंत्री आहे जे असे वक्तव्य करतात. शुकरमाना लोक तुम्हाला मारत नाही, त्यामुळे ही नालायकी थांबवा, अशी प्रतिक्रिया हि बच्चू कडू यांनी यावेळी बोलताना दिली.

गेल्या काही दिवसांपासून महायुती सरकारमधील मंत्र्यांसह नेत्यांची सुद्धा कर्जमाफीवरून शेतकऱ्यांवर बेताल वक्तव्ये करण्याची मालिकाच सुरु असून या यादीत आता विखे पाटील यांची भर पडली आहे. आधी कर्जबाजारी व्हायचं आणि नंतर पुन्हा कर्जमाफी मागायची, हे गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असल्याची मुक्ताफळे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी उधळली आहेत.

सोसायटी काढायची, कर्ज काढायचं, पुन्हा कर्ज माफ करून घ्यायचं, आणि पुन्हा कर्जमाफीची मागणी करायची, हे अनेक वर्ष काम चालू असल्याचे विखे पाटील यांनी म्हटलं आहे.

विखे पाटील यांच्यावर शेतकरी नेत्यांसह सोशल मीडियातून सडकून टीकेचा प्रहार झाल्यानंतर आता शेतकरी नेते आणि प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांनी देखील सडकून टीका केलीय.

दिल्लीतील राष्ट्रीय जनजाती आयोगात सकारात्मक बैठक पार

किनवट : (समर्थ गांवकरी)

१० नोव्हेंबर रोजी दिल्ली येथे राष्ट्रीय जनजाती आयोगात आमदार भिमराव केराम यांच्या तक्रारीच्या व दाखल प्रकरणाच्या अनुषंगाने झालेल्या महत्त्वपूर्ण सुनावणीत किनवट-माहूर विधानसभा क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या कापूस या पिकाची तेलंगणा राज्यातील आदिलाबाद येथील CCI (Cotton Corporation of India) केंद्रांवर विक्री करण्यास परवानगी देण्याबाबत सुनावणी करण्यात आली. या सुनावणीत CCI चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (CMD) ललित गुप्ता, महाराष्ट्र शासनाच्या पणन विभागाचे अधिकारी महाजन, तसेच वस्त्रोद्योग विभागाचे सचिव उपस्थित होते. आमदार भिमराव केराम यांनी शेतकऱ्यांच्या हिताचे मुद्दे ठामपणे मांडत, सीमावर्ती भागातील शेतकऱ्यांना आदिलाबादसह तेलंगणातील CCI केंद्रांवर कापूस विक्री करण्याची परवानगी मिळावी, अशी मागणी केली.

या चर्चेला राष्ट्रीय जनजाती आयोगाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, या प्रकरणावरील पुढील सुनावणी दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी निश्चित करण्यात आली आहे.

या सुनावणीत झालेल्या चर्चेमुळे किनवट-माहूर परिसरातील शेतकऱ्यांच्या कापूस पिकाच्या विक्रीच्या समस्येचे निराकरण होण्याची आशेची किरण निर्माण झाली आहे.

स्वस्तधान्य दुकानदाराकडून तहसीलदारांकडे तक्रार

नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)

बिलोली तालुक्यातील गागलेगाव येथील स्वस्त धान्य दुकानासमोर ७ नोव्हेंबर रोजी चौकशी दरम्यान निर्माण झालेल्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर दुकानदार आणि ग्रामपंचायत सदस्य पिराजी नागोराव कमळे यांनी तहसीलदार बिलोली यांच्याकडे रीतसर तक्रार केली आहे. या तक्रारीत माजी सरपंच आणि त्यांच्या समर्थकांनी खोटी माहिती पसरवून गावात खोटी दवंडी देऊन नागरिकांची व प्रशासनाची दिशाभूल करून गावात गोंधळ घातला याबाबत चौकशी करून कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. ६ नोव्हेंबर रोजी रात्री, माजी सरपंच यांच्या सूचनेनुसार लक्ष्मण जाधव यांनी गावात दवंडी दिली. या दवंडीमध्ये "ज्यांना राशन मिळत नाही त्यांना तहसीलदार पैसे देणार आहेत" अशी घोषणा करण्यात आली. ही माहिती ग्रामपंचायतीकडून अधिकृतपणे मंजूर न झाल्याने गावकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आणि दुसऱ्या दिवशी दुकानासमोर मोठी गर्दी जमली.

वाबळे दांम्पत्याचा हा उपक्रम कौतुकास्पद व अभिमानास्पद : डॉ. रामदास बांगर

माजी सैनिक मनसुख वाबळे व समाजसेविका सौ. शालिनी वाबळे यांच्या वतीने मोफत आरोग्य शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

स्थानिक नागरिकांच्या आरोग्यविषयक जाणीवेत वाढ व्हावी या हेतूने आम्रपाली मंगल कार्यालयात माजी सैनिक मनसुख वाबळे व समाजसेविका सौ.शालिनी वाबळे यांच्या वतीने मोफत सर्वसाधारण आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन बालरोगतज्ञ डॉ रामदास बांगर यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. राहुल पंडित, डॉ. अतुल खालकर,डॉ. अरविंद अनचवले, नेत्रतज्ञ डॉ. प्रफुल चौधरी, डॉ. अमित करडे, माजी सैनिक मनसुख वाबळे, समाजसेविका सौ.शालिनी वाबळे,सागर वाबळे

आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिरात रक्तदाब, मधुमेह, हिमोग्लोबिन, हाडांची घनता, दृष्टी व वजन तपासणी या विविध चाचण्या मोफत करण्यात आल्या. तब्बल २५० हून अधिक नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. डॉ. रामदास बांगर म्हणाले की वाबळे दांम्पत्याचा हा उपक्रम कौतुकास्पद व अभिमानास्पद आहे ज्या समाजात आपण रहातो त्या समाजाकरीता केलेला उपक्रम महत्वाचा आहे आजच्या वेगवान जीवनशैलीत नागरिक आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत आहेत आजार झाल्यानंतर उपचार घेण्यापेक्षा नियमित तपासणी करून रोग लवकर बरा करावा समाजात आरोग्यविषयक जनजागृती करण्यासाठी अश्या शिबिराचे आयोजन खूप गरजेचे आहे नियमित व्यायाम संतुलित आहार आणि तणावमुक्त जीवनशैली अंगीकारल्यासअनेक आजारापासून बचाव होउ शकतो.

शालिनी वाबळे म्हणाल्या, "आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे अशा मोफत आरोग्य शिबिरांची गरज प्रत्येक वसाहतीमध्ये आहे. नियमित तपासणी करून आपले आरोग्य सांभाळणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे." मनसुख वाबळे म्हणाले, "सामाजिक बांधिलकी म्हणून हे शिबिर आयोजित केले आहे. लोकांना आरोग्याबाबत जागरूक करण्याचा आमचा प्रयत्न आहे. पुढेही विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविण्याचे आमचे नियोजन आहे."

शिबिर यशस्वी करण्यासाठी संस्थेचे कार्यकर्ते, स्वयंसेवक व डॉक्टरांचा मोठा सहभाग लाभला. नागरिकांनी शिबिराबद्दल समाधान व्यक्त करत, अशा उपक्रमांची पुनरावृत्ती व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली.गुलमोहोर रोड परीसरातील ज्येष्ठ नागरिक मोठया संख्येने आले होते. भारतीय माजी सैनिक संघटना, प्रहार माजी सैनिक संघटना , त्रिदल माजी सैनिक संघटना , जय हिंद सैनिक फाउंडेशन अहमदनगर नवीन vetrans संघटना,अहिल्यानगर नौसेना वेटर्न्स गुपचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

भारतीय शेतकऱ्यांसाठी शाश्वत आणि अचूक कीटक नियंत्रणाला प्रोत्साहन

पुणे : (समर्थ गांवकरी)

कॉर्टेवा ॲग्रोसायन्सने आपल्या डेलिगेट® कीटकनाशकातील अद्यतनांची घोषणा केली, ज्यामुळे मका, कापूस आणि मिरचीच्या भारतीय शेतकऱ्यांसाठी एकात्मिक कीटक व्यवस्थापनामध्ये एक विश्वसनीय उपाय म्हणून त्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. सिद्ध परिणामकारकता, कीटक प्रतिकारशक्ती व्यवस्थापन आणि आर्थिक मूल्यामुळे, डेलिगेट भारतीय शेतकऱ्यांना अधिक उत्पादनक्षमता आणि लवचिकता प्राप्त करण्यास सक्षम करते. अनेक वर्षांपासून, डेलिगेट शेतकऱ्यांसाठी एक विश्वासार्ह मित्र राहिले आहे, जे मक्यातील फॉल आर्मीवर्म (FAW) आणि कापूस व मिरचीतील थ्रिप्ससारख्या हानिकारक कीटकांवर जलद-अभिनय आणि प्रभावी नियंत्रणासाठी ओळखले जाते. हे धोरणात्मक परिष्करण पारंपारिक कीटक नियंत्रणापलीकडे जाते, डेलिगेटचे अद्वितीय वैज्ञानिक गुणधर्म अधोरेखित करते जे पीक संरक्षणासाठी अधिक सक्रिय आणि शाश्वत दृष्टिकोन वाढवतात. शेतीचे स्वरूप वेगाने बदलत आहे, ज्यामुळे अधिक अचूक आणि शाश्वत उपायांची मागणी वाढत आहे. डेलिगेट शेतकऱ्यांना सक्षम करून आणि FAW आणि थ्रिप्ससारख्या कीटकांना प्रभावीपणे लक्ष्य करून हे संतुलन साधते, तसेच मधमाश्या आणि नैसर्गिक शत्रूसारख्या फायदेशीर कीटकांना सुरक्षित ठेवते. त्याची केंद्रित क्रिया शेती परिसंस्थेच्या आरोग्यास समर्थन देते आणि आधुनिक IPM तत्त्वांशी जुळते. याव्यतिरिक्त, ते पर्यावरणीय संतुलन राखण्यास मदत करते, ज्यामुळे चांगले पीक आणि उच्च दर्जाचे उत्पादन मिळते. त्याचा अवशिष्ट परिणाम दीर्घकाळ संरक्षण प्रदान करतो, वारंवार फवारणीची गरज कमी करतो आणि शेतकऱ्यांचा वेळ व संसाधने वाचवतो. इष्टतम वेळी डेलिगेटचा वापर केल्याने त्याचे फायदे वाढतात. मक्यासाठी, पेरणीनंतर १५-२५ दिवसांनी एकदा फवारणी केल्याने FAW पासून संरक्षण मिळते आणि एकसमान वाढ होते, तर ३०-३५ दिवसांनी दुसरी फवारणी केल्याने संरक्षण मजबूत होते, कणसाची गुणवत्ता सुधारते आणि उत्पादनाची गुणवत्ता वाढते. कापसामध्ये, फुलोऱ्याच्या वेळी पहिला वापर थ्रिप्सवर नियंत्रण मिळवतो, तर बोंड तयार होण्याच्या वेळी पुढील वापर बोंडाची वाढ वाढवतो आणि इतर लेपिडोप्टेरन कीटकांपासून संरक्षण देतो. मिरचीसाठी, फुलोरा आणि फळे लागण्याच्या सुरुवातीच्या टप्प्यांसारख्या महत्त्वाच्या टप्प्यांवर योग्य वेळी फवारणी केल्याने थ्रिप्सचे नुकसान टाळता येते, परिणामी फळांची गुणवत्ता चांगली होते आणि उत्पादन वाढते.

डेलिगेटला आधुनिक IPM पद्धतींमध्ये समाकलित केल्याने शेतकऱ्यांना एक विश्वसनीय, शाश्वत आणि फायदेशीर उपाय मिळतो जो फवारणी कमी करतो, शेतकऱ्यांचा वेळ, श्रम आणि संसाधने वाचवतो.

बंधन म्युच्युअल फंडचा 'बंधन हेल्थकेअर फंड' लॉंच

पुणे: (समर्थ गांवकरी)

बंधन म्युच्युअल फंडने 'बंधन हेल्थकेअर फंड' च्या लॉंचची घोषणा केली आहे. ही एक ओपन-एंडेड इक्विटी योजना आहे, जी आरोग्य सेवा (हेल्थकेअर), औषधनिर्मिती (फार्मा) आणि त्यासंबंधित सेवा क्षेत्रात गुंतवणूक करते. हा फंड भारतातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांपैकी एक असलेल्या हेल्थकेअर क्षेत्रातील हॉस्पिटल्स, डायग्नोस्टिक्स, फार्मास्युटिकल्स, बायोटेक्नॉलॉजी, वेलनेस आणि हेल्थ-टेक यांसारख्या विविध संधींचा लाभ घेण्याचा प्रयत्न करतो. या फंडचा न्यू फंड ऑफर (एनएफओ) सोमवार, १० नोव्हेंबर २०२५ रोजी खुला होणार असून २४ नोव्हेंबर २०२५ रोजी बंद होणार आहे. बंधन हेल्थकेअर फंडमध्ये गुंतवणूक परवानाधारक म्युच्युअल फंड वितरकांमार्फत, गुंतवणूक सल्लागार, ऑनलाइन प्लॅटफॉर्म किंवा थेट https://bandhanmutual.com/nfo/bandhan-healthcare-fund/ या संकेतस्थळावरून करता येईल. नव्या ऑफरबाबत बंधन एएमसीचे सीईओ विशाल कपूर म्हणाले की, "हेल्थकेअर ही केवळ एक गरज नाही, तर आपल्या काळातील सर्वात मजबूत आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या वाढीच्या थीम्सपैकी एक आहे. वाढती लोकसंख्या आणि वैद्यकीय क्षेत्रातील नवोन्मेष यामुळे भारतासह जगभरात हेल्थकेअर इकोसिस्टम झपाट्याने विस्तारत आहे. आर्थिक प्रगतीबरोबरच आरोग्यसेवांवरील खर्च नैसर्गिकरीत्या वाढत आहे आणि भारतही याला अपवाद नाही. मजबूत वाढ असूनही प्रति व्यक्ती खर्च आणि आरोग्य अधोसंरचना अद्याप तुलनेने कमी आहे. मात्र, विमा कव्हरेज आणि उत्पन्नातील सुधारणा यामुळे या क्षेत्राला पुढे वाढण्यासाठी मोठी संधी आहे. बंधन हेल्थकेअर फंड गुंतवणूकदारांना या संरचनात्मक बदलात शिस्तबद्ध आणि विविधीकृत पद्धतीने सहभागी होण्याची संधी देतो.

थोडक्यात बातम्या...

वैद्यकीय टीमच्या समन्वयामुळे गंभीर प्रसूती रुग्णाचा जीव वाचवण्यात यश

पुणे (स. गांवकरी) : मेडिकव्हर केएलई हॉस्पिटल, पिंपरी येथे गंभीर प्रसूतीनंतरच्या गुंतागुंतींवर यशस्वी उपचार घेतलेल्या एका ३५ वर्षीय महिलेचा पूर्णपणे बरा होऊन डिस्चार्ज देण्यात आला आहे. रुग्णाला २१ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी येथे सिझेरियन शस्त्रक्रिया करण्यात आली होती. त्यानंतर प्रकृती बिघडल्यामुळे तिला २४ ऑक्टोबर २०२५ रोजी गंभीर अवस्थेत मेडिकव्हर केएलई हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. रुग्णाला प्री-एक्लॅम्पसिया, प्लॅसेंटल अब्रप्शन, आणि ३६ आठवड्यांवर गर्भातील बाळाचा मृत्यू झाल्याचे निदान झाले होते. त्यासोबतच ती प्रसूतीनंतरचा अतिरक्तस्त्राव (PPH), अकस्मात मूत्रपिंड निकामी होणे (AKI), सेप्सिस, डिसेमिनेटेड इंट्रावॅस्क्युलर कोअग्युलेशन (DIC) आणि थ्रोम्बोटिक मायक्रोॲंजिओपथीचा संशय अशा गुंतागुंतींनी ग्रस्त होती. डॉ. रिजवान अब्दुल हकीम मलिक (फिजिशियन आणि डायबेटोलॉजिस्ट) यांच्या नेतृत्वाखाली आणि डॉ. शरयू राजेंद्र मिरजी (प्रसूती व स्त्रीरोग तज्ञ), डॉ. दीपक पाटील (प्लास्टिक सर्जन), आणि डॉ. पवन वाखरे (नेफ्रॉलॉजिस्ट) यांच्या बहुविषयक टीमच्या सहकार्याने रुग्णावर अत्यंत जटिल उपचार करण्यात आले. यात सेंट्रल लाईन व डायालिसिस कॅथेटर इन्सर्शन, हिमोडायलिसिस, आणि २४ ते २९ ऑक्टोबरदरम्यान चार वेळा प्लाझ्माफेरेसिस (प्लाझ्मा एक्स्चेंज) यांचा समावेश होता. रुग्णावर अतिदक्षता विभागात (ICU) सतत निरीक्षण ठेवण्यात आले. ॲडव्हान्स्ड लाइफ सपोर्ट, ॲंटिबायोटिक थेरपी, आणि अनेक रक्त संक्रमण (ट्रान्सफ्युजन) यांच्या मदतीने तिची प्रकृती हळूहळू सुधारली. पुढे सर्व जीवनमानक चाचण्यांमध्ये स्थिरता आल्यावर तिला सामान्य वॉर्डमध्ये हलविण्यात आले.

कल्याणी स्कूलचे दोन विजय, एक सामना ड्रॉ

पुणे (स. गांवकरी) : पाषाण येथील लोयोला एच.एस. मैदानावर टाटा ऑटोकॉम्पच्या प्रायोजित लोयोला फुटबॉल कप २०२५ मध्ये सातव्या दिवशी जे.एन. पेटिट टेक्निकल स्कूलला १६ वर्षांखालील विभागात वगळता हचिंग्ज एचएसने चांगलेच झुंजविले. कल्याणी स्कूलने दोन विजय आणि एक सामना अनिर्णित राखत चांगले सातत्य राखले. दिवसाची सुरुवात १६ वर्षांखालील विभागातील क गट सामन्यात जेएन पेटिट टेक्निकल स्कूलने हचिंग्ज एच.एस. ला ६-० अशा विजयाने केली. दक्ष पिल्लेचे (३', ६', ४६') तीन गोल त्यांच्या विजयाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले. दक्ष याला दानिश गोनल (२८ मिनिटे) आणि अद्ययान शेख यांची (४३ मिनिटे) चांगली साथ लाभली. १४ वर्षांखालील गटात, जेएन पेटिट टेक्निकल स्कूलने हचिंग्ज एच.एस. विरुद्ध १-१ अशी बरोबरी साधली (तन्विश खैरनार (२३ मिनिटे) याने पहिल्या सत्रात जेएन पेटिट टेक्निकल स्कूलकडून पहिला गोल केला. त्यानंतर, शौर्य परदेशीने (४८ मिनिटे) हचिंग्ज एच.एस. ला बरोबरी साधून दिली. नंतर, १२ वर्षांखालील गटात, जेएन पेटिट टेक्निकल स्कूलने हचिंग्ज एचएसला १-१ असे बरोबरीत रोखले. हचिंग्ज एचएसने विवान शेनॉय (१४ व्या मिनिटाला) या सामन्यासाठी गोल केला. त्यानंतर, जेएन पेटिट टेक्निकल स्कूलकडून अगस्त्य बर्डेने (२९ व्या मिनिटाला) गोल करत बरोबरी साधली.

अमृता खानविलकर यांचा कलंक निर्मूलन मोहिमेला पाठिंबा

नवी दिल्ली (स. गांवकरी) : ZEE5 ची मराठी ओरिजिनल मालिका बाई तुझ्यापायी ही केवळ लोकांच्या हृदयाला भिडलेली कथा नाही, तर तिने एक सामाजिक चळवळ निर्माण केली आहे. या मालिकेत दाखवलेली अहिल्याची धैर्याची आणि प्रश्न विचारण्याची प्रवासकथा आता महाराष्ट्रात मासिक पाळीवरील कलंक आणि लैंगिक असमानतेविरोधात चर्चा सुरू करण्याचे कारण ठरली आहे. #मीपणअहिल्या या मोहिमेद्वारे ZEE5 ने कलाकार, प्रभावशाली व्यक्ती, विद्यार्थी आणि नागरिकांना एकत्र आणले — अहिल्याचा साधा पण ताकदवान प्रश्न "का?" (Why?) पुन्हा विचारण्यासाठी. जे एका मालिकेतून सुरू झाले, ते आता वास्तवातील चळवळ बनले आहे — लोकांनी आपल्या लाल तळहातांनी ऐक्य आणि सामर्थ्याचे प्रतीक म्हणून आवाज उठवला आहे, मौन आणि लज्जेविरुद्ध. या मोहिमेने सर्जनशीलतेचा वापर रस्त्यांवर आणि स्क्रीनपलीकडेही केला. डोंबिवलीतील कॉलेज थिएटर ग्रुपसनी हृदयस्पर्शी स्ट्रीट प्ले सादर केले, आणि प्रत्येक नाटकाच्या शेवटी प्रेक्षकांनी लाल तळहात उंचावले — सार्वजनिक ठिकाणे संवाद आणि परिवर्तनाचे व्यासपीठ बनली. ऑनलाईन देखील या चळवळीने वेग घेतला. अमृता खानविलकर यांच्यासह महाराष्ट्रातील अनेक प्रख्यात मराठी कलाकार आणि 100 हून अधिक इन्फ्लुएन्सर्सनी सोशल मीडियावर अहिल्याचा संदेश पुढे नेला — ज्यामुळे #मीपणअहिल्या मोहिमेने जागरूकता आणि एकतेची लाट निर्माण केली. या मोहिमेबद्दल आपल्या भावना व्यक्त करताना अमृता खानविलकर म्हणाल्या, "अहिल्याची कथा मला अतिशय भावली — अंधश्रद्धेला प्रश्न विचारण्याचे तिचे धैर्य आणि शिक्षण मिळविण्याची तिची चिकाटी असंख्य महिलांच्या स्वप्नांचा आणि संघर्षाचा आवाज आहे.

नीती आयोग टॅक्स पॉलिसीच्या अध्यक्षांची ब्लू ओशन कॉर्पोरेशन ॲड्वायजरी बोर्डावर नियुक्ती

पुणे : (समर्थ गांवकरी)

भारताच्या आर्थिक विकास आणि व्यावसायिक विकास क्षेत्राप्रती आपली वाढती बांधिलकी अधोरेखित करत, ब्लू ओशन कॉर्पोरेशन या लंडन येथे मुख्यालय असलेल्या आणि पुरवठा साखळी सल्लागार आणि प्रशिक्षणामध्ये जागतिक स्तरावर प्रथम क्रमांकावर असलेल्या उद्योगसमूहाने, नीती आयोगातील (NITI Aayog - National Institution for Transforming India) कर धोरण सल्लागार गटाचे (Consultative Group on Tax Policy) अध्यक्ष श्री पुष्पिन्दर एस. पुनिहा यांची आपल्या सल्लागार मंडळात (Advisory Board) नियुक्ती केल्याची घोषणा केली आहे.

सध्याच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये अनेक संरचनात्मक सुधारणा होत आहेत, ज्यामध्ये करप्रणालीमध्ये सुधारणा, पुरवठा साखळीचे आधुनिकीकरण आणि धोरणात्मक वाढ हे भारताच्या विकास अजेंड्याच्या केंद्रस्थानी आहेत. अशावेळी श्री पुनिहा आणि ब्लू ओशन यांचा सहयोग होणे ही अतिशय समयोचित आणि महत्त्वपूर्ण बाब आहे. वित्तीय व्यवस्थापन आणि प्रशासनातील त्यांचा विस्तृत अनुभव ब्लू ओशनला त्यांच्या सल्लासेवा, प्रशिक्षण आणि क्षमता-निर्माण उपक्रमांना भारताच्या राष्ट्रीय प्राधान्यक्रमांशी जोडण्यासाठी अद्वितीय इन्साईट्स प्रदान करेल. हा सहयोग ब्लू ओशनच्या भारतातील धोरणात्मक विस्ताराला देखील बळकटी देईल. देशाची पुरवठा साखळी इकोसिस्टिम मजबूत करण्यासाठी, कुशल प्रतिभा निर्माण करण्यासाठी आणि व्यापार व मालवाहतुकीचे जागतिक केंद्र बनण्याच्या भारताच्या दृष्टिकोनाला पाठिंबा देण्यासाठी ब्लू ओशन कटिबद्ध आहे.

ब्लू ओशन कॉर्पोरेशनचे बोर्ड सदस्य सौरव गांगुली म्हणाले, "मी यापूर्वी बीसीसीआयमध्ये श्री. पुनिहा यांच्यासोबत काम केले असल्याने, त्यांच्या कौशल्यामुळे आणि व्यावसायिकतेमुळे ते किती महत्त्वपूर्ण आहेत हे मी चांगलेच जाणतो. ब्लू ओशनमध्ये पुन्हा एकदा त्यांच्यासोबत काम करणे हा एक सन्मान आहे, जिथे सल्लागार मंडळात ते असल्याने आम्हाला भविष्यातील वाढ आणि प्रभाव साधण्यात मदत मिळेल."

ब्लू ओशन कॉर्पोरेशनने नीती आयोगातील एका ज्येष्ठ धोरण नेत्याला आपल्या मंडळामध्ये सहभागी करून घेण्याचा निर्णय, धोरण निर्मिती आणि प्रोफेशनल प्रॅक्टिस यांच्यात एक दुवा निर्माण केल्याचा संकेत आहे.

भारताच्या सर्वोच्च धोरण थिंक टँकमधील विचार नेतृत्वामध्ये समन्वय घडवून आणून, कॉर्पोरेशनचे उद्दिष्ट आहे की भविष्य-केंद्रित आणि सरकारच्या आर्थिक दृष्टिकोनाला त्यांच्या सेवा पाठिंबा देत राहतील, ज्यात 'मेक इन इंडिया', 'डिजिटल इंडिया' आणि 'स्किल इंडिया' सारख्या उपक्रमांचा समावेश आहे.

श्री. पुनिहा यांनी सल्लागार मंडळात सामील होण्याबद्दल आपला उत्साह व्यक्त केला, ते म्हणाले: "ब्लू ओशनमध्ये, मला भावलेली सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे जागतिक कौशल्यांना भारताच्या आर्थिक प्राधान्यांशी जोडून घेण्याची तीव्र बांधिलकी. एकत्रितपणे, आम्ही असे उपक्रम राबवू जे कुशल प्रतिभा निर्माण करतील आणि जागतिक पुरवठा साखळी केंद्र म्हणून भारताचे स्थान बळकट करतील."

लोहा तालुक्यातील वडेपुरी शिवारात बिबट्या आढळला

नांदेड : (समर्थ गांवकरी)

लोहा तालुक्यातील वडेपुरी येथील माता रत्नेश्वरी देवीच्या दर्शनासाठी नांदेड येथील व्यापारी हे चारचाकी वाहनाने गेले असता . ते परिवार दर्शन घेऊन परत येत असताना वन्य प्राणी बिबट्या हा रत्नेश्वरी गडाच्या पायथ्याखालील एका हॉटेल नजीक आढळून आला. सदरील व्यापाऱ्याने स्वतःच्या मोबाईल द्वारे बिबट्याचे छायाचित्रण व व्हिडीओ करून सदर छायाचित्रण स्थानिक पोलिस पाटील, व वन विभागास कळविले. सदरील घटना दि. ९ नोव्हेंबर रोजी रात्री अंदाजे साडेसात वाजताच्या सुमारास घडली. नांदेड येथील व्यापारी अतुल सेन हे दि. ९ रोजी वडेपुरी येथील माता रत्नेश्वरी देवीच्या दर्शनासाठी गेले होते. दर्शन करून रात्री साडेसात वाजताच्या सुमारास रत्नेश्वरी गड पायथ्याखालील रस्त्याने झरी मार्गे नांदेडला जात असताना एका हॉटेल नजीक बिबट्या हा आढळून आला. सेन यांनी सदरील बिबट्याचे मोबाईल द्वारे चित्रण केले. तोपर्यंत सदर बिबट्या काहीकाळ जागेवरच उभा होता. सदरील माहिती गावचे पोलिस पाटील आणि वन विभागास कळविण्यात आली. वन विभाग कर्मचारी सदर बिबट्याचा सर्वत्र शोध घेत होते.

रोखठोक नाना उतरणार निवडणुकीच्या रिंगणात

■ प्रस्थापितांचे धाबे दणाणले

शहापूर : (समर्थ गांवकरी)

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे वेध सर्वांना लागले असून शहापूर तालुक्यात अतिशय प्रतिष्ठेचा समजल्या जाणाऱ्या नडगाव जिल्हा परिषद गटातून मतदारांच्या आग्रहाखातर कार्यकर्त्यांच्या आणि शिवसैनिकांच्या इच्छेचा मान राखून यावेळी प्रथमच शिवसेनेचा ढाण्या वाघ म्हणून ओळख असणारे रोखठोक नाना अर्थात शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मारुती धिर्डे निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे

खात्रीलायक वृत्त समजल्याने प्रस्थापितांचे धाबे दणाणले आहेत. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय समजले जाणारे जिल्हाप्रमुख मारुती धिर्डे हे शिवसेना उपनेते प्रकाश पाटील तसेच शिवसेना उपनेते निलेश सांबरे यांच्या खांद्याला खांदा लावून शहापूरात नव्हे तर जिल्ह्यात शिवसेना बळकट करत असल्याचे चित्र सध्या पाहावयास मिळत आहे. त्यांनी आपल्या अनेक वर्षांच्या राजकीय कारकीर्दीत अद्याप कुठल्याही प्रकारची निवडणूक लढली नाही. मात्र ठाणे जिल्हा परिषद असो किंवा शहापूर पंचायत समिती नव्हे तर शहापूर नगरपंचायत मध्ये शिवसेनेचा भगवा मोठ्या स्वाभिमानाने आजतागायत फडकवल्याचा इतिहास त्यांनी कायम ठेवला आहे. तालुक्यात कुठल्याही प्रकारची आपत्ती किंवा सुखदुःखाचे प्रसंग यामध्ये त्यांनी आपल्या मदतीचा हात नेहमीच सर्वात पुढे ठेवला आहे. वेळेअभावी कधी त्यांना त्या ठिकाणी पोहोचता आले नाही तरी त्यांनी आपली मदत त्या ठिकाणी सर्वात पुढे पोहोचवण्याची कामगिरी निस्वार्थ भावनेने केल्याची अनेक उदाहरणे आहेत. नडगाव जिल्हा परिषद गटात त्यांची उमेदवारी म्हणजे प्रस्थापितांना मोठा धक्का असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. जिल्हाप्रमुख मारुती धिर्डे आणि सर्वांना हवे हवेसे वाटणारे रोखठोक नाना उमेदवारी करणार या नुसत्या विचारानेच शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य संचालले आहे.

उस्माननगर, लाडका, आलेगाव साठी २७ लक्ष रुपयाचा निधी

नांदेड : (समर्थ गांवकरी)

शिराढोण गटातील उस्मान नगर लाडका आणि आलेगाव या गावच्या विकास कामासाठी राज्यसभा खासदार डॉ अजित गोपछडे यांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत २७ लक्ष रुपयांचा निधी या भागाचे नेते माजी सभापती बालाजी माधवरावजी पांडागळे यांनी प्रयत्न करून निधी मिळवून दिला. या निधीतील कामाचे भूमिपूजन लाडका येथे पार पडले. या विकास निधीच्या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून माजी सभापती तथा भाजपाचे उत्तर चे मंडळ अध्यक्ष

बालाजी पांडागळे यांच्या शुभहस्ते पार पडले. या भागाचे विकासात्मक कामे व्हावी व लोकोपयोगी कामांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे. असा नेहमीच कार्यतत्पर असणारे विकासाची दूरदृष्टीचे नेतृत्व गोरगरीब जनतेला सदैव मदतीचा हात देणारा एक मनकवडा म्हणून सदैव जनतेच्या मनी असणारा माजी सभापती बालाजी पांडागळे हे कुठल्याही पदावर नसताना देखील या भागाचा विकास व्हावा .या भागातील जनतेच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी नेहमी तत्पर असतात .त्यांच्या अथक परिश्रमातून या भागाचा कायम विकास झालेला आहे नेहमीच ते राजकीय नेत्यांच्या जवळीक असतात आपल्या परिसराला विकासात्मक दर्जा प्राप्त व्हावा हे नेहमीच त्यांची सद्भावना असते त्या भावनेतून त्यांनी नांदेड जिल्ह्याचे राज्यसभा खासदार डॉ .अजित गोपछडे यांच्याकडे पाठपुरावा करून आलेगाव येथील हनुमान मंदिराच्या सभा मंडपासाठी १० लाख रुपये ,तसेच लाडका येथील दत्त मंदिराच्या सभागृहासाठी १० लाख रुपये तर उस्मान नगर येथील खुरेशी गल्ली शादी खाना बांधकामासाठी सात लक्ष रुपये असा एक २७ लक्ष रुपयाचा निधी या परिसराच्या विकासासाठी खेचून आणला.

स्कूटरसारख्या सोयी असणारी - 'एन-फर्स्ट' ईव्ही 'न्युमरस' तर्फे सादर

पुणे: (समर्थ गांवकरी)

विद्युत वाहन निर्मिती क्षेत्रातील देशातील आघाडीच्या नवोन्मेषक कंपन्यांपैकी एक असलेल्या 'न्युमरस मोटर्स' ने आज बेंगलुरूमध्ये आपली दुसरी इलेक्ट्रिक दुचाकी 'एन-फर्स्ट' सादर केली. बाईकची स्थिरता आणि स्कूटरची उपयुक्तता यांचा संगम असलेले हे वाहन खासकरून तरुण शहरी प्रवासी आणि महिलांसाठी डिझाइन करण्यात आले आहे.

'एन-फर्स्ट' ची प्रारंभिक किंमत ₹६४,९९९ इतकी ठेवण्यात आली असून ती फक्त पहिल्या १,००० खरेदीदारांसाठी लागू असेल. "चेंज युवर व्हाइब" या घोषवाक्याखाली सादर केलेले हे मॉडेल परवडणारे, स्वच्छ आणि आकर्षक शहरी वाहतुकीचे नवे प्रतीक ठरणार आहे.

ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर निश्चित करतो फॅशनचा पुढचा प्रवास

नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)

फॅशन क्षेत्रातील भारतातील सुप्रसिद्ध असलेला ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर, 2025 मध्ये आणखी एका शानदार आवृत्ती घेऊन परत येत आहे जिथे फॅशन, क्रिएटिव्हीटी आणि संस्कृती या तिन्ही गोष्टी एकत्र येतात आणि 'द वन अँड ओन्ली' असे केवळ एकच व्यासपीठ तयार करतात जे फॅशनमध्ये पुढील मोठे पाऊल ठरणार आहे. जिथे ट्रेंड्स बहुतेकदा क्षणभंगुर असतात तिथे फॅशन टूरने सर्वात धाडसी पाऊल उचलले आहे आणि फॅशनला पुढे नेण्याचा आणि 'फॅशनचा पुढचा प्रवास' निश्चित करण्याचा अर्थ काय आहे याची कल्पना पुन्हा मांडली आहे. ही फक्त एक थीम

नाही - तर ती एक घोषणा आहे, एक निश्चित विधान आहे की, फॅशनचा पुढचा अध्याय कुठेही सुरू होत नसून तो ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूरच्या टप्प्यांवर सुरू होतो.

फॅशन डिझाईन कौन्सिल ऑफ इंडिया (FDCI) सोबत पुन्हा एकदा एकत्रीकरण करत, फॅशन टूर भारतातील प्रसिद्ध आणि अग्रेसर अशा डिझायनर्स आणि प्रसिद्ध स्टाईल क्षेत्रातील व्यक्तींना एकत्र आणते जेणेकरून फॅशनच्या क्षेत्रात कधीही न पाहिलेले अनुभव सादर करता येतील.

या टूरमध्ये गुरुग्राममध्ये 'द फ्युचरव्हर्स ऑफ फॅशन' हा कोर्स निश्चित होईल ज्यामध्ये डिझायनर्स फाल्गुनी आणि शेन पीकॉक, शाहिद कपूर आणि तमन्ना भाटिया यांचा समावेश असेल, ज्यामुळे फॅशन अनुभवांचे भविष्य उलगडेल. हा कोर्स फॅशनचा मार्ग कसा असू शकतो हे पुन्हा निश्चित करून सांगेल – जो तंत्रज्ञान आणि वेशभूषा यांच्यात जे अंतर पडले आहे ते दूर करणारा, व्हिज्युअल पद्धतीने प्रदर्शन करणारा, फॅशन अनुभव क्षेत्रात बदल घडवून आणणारा ठरणार आहे. त्यानंतर हा टूर जयपूरला 'हाय ऑक्टेन कॉउचर' मध्ये जाईल जिथे डिझायनर अभिषेक पटणी आणि नम्रता जोशीपुरा मोटरस्पोर्ट्सच्या जगातून फॅशन जगतात वेग, शक्ती आणि अचूकता आणतील, जागतिक शैलीची एक नवीन भाषा मांडतील. मिस युनिव्हर्स (2021) हरनाज संधू आणि रॅपर रफ्तारची निर्विवाद ऊर्जा असलेले, हा प्रवास पूर्ण थ्रॉटलवर फॅशनचे आश्वासन देईल - उत्साहवर्धक, निर्भय आणि निश्चितीच ग्लॅमरस असणार आहे. कोलकाता येथील अंतिम फेरीत हा टूर 'ब्रेकिंग द मोल्ड्स ऑफ फॅशन क्राफ्ट' येथे आयकॉनिक डिझायनर अनामिका खन्ना आणि ईशान खट्टर यांच्यासह पुन्हा प्रवेश करेल. हा अध्याय उत्तम कारागिरीवर प्रकाश टाकेल आणि समकालीन दृष्टिकोनाशी जोडणारा एक संबंध तयार करेल, ज्यामुळे प्रेक्षकांना केवळ फॅशनचे कौतुकच नाही तर कलाकृतीचा आदरही वाटेल. पर्नोड रिचार्ड इंडियाचे CMO डेबाश्री दासगुप्ता म्हणाल्या, "ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर हा भारतीय फॅशनचा सर्वात प्रतिष्ठित टप्पा आहे.

आमच्या 'द वन अँड ओन्ली' ध्येयानुसार, आम्ही भारतातील सर्वोत्तम डिझायनर्स आणि FDCI यांच्या सहकार्याने फॅशन आणि स्टाईलच्या उत्क्रांतीला आकार देणारा नवीन टप्पा तयार करत आहोत.